१०२ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ


NAVAKAL

• पुणे, रविवार ८ डिसेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-८२, पाने-८, किंमत : ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 82, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 8 December, 2024 Page- 8 Price- Rs. 7/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## जम्मू-काश्मीर गारठले झोझिलाचे तापमान -१९



**श्रीनगर -** अचानक आलेल्या थंडीमुळे जम्मू-काश्मीर अक्षरश: गारठले असून, काल श्रीनगरमधील रात्रीचे तापमान शून्याखाली नोंदवले गेले आहे. राज्यातील अनेक भागांतील तापमानात लक्षणीय घट झाली आहे. या मोसमातील हे नीचांकी तापमान असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. जम्मू-काश्मीरमधील ११ जिल्ह्यांत तापमान शून्याच्या खाली गेले असून, झोझिला येथे सर्वात कमी उणे -१९ तापमानाची नोंद झाली आहे. काश्मीरमधील हवामान कोरडे असले तरी जम्मूमध्ये उद्या व परवा हलका पाऊस व हिमवृष्टीचा इशाराही देण्यात आला आहे.

# पहिल्या दिवशी बालिश आंदोलन मविआ आमदारांनी शपथ घेतली नाही

■ मुंबई

**मविआच्या** नेत्यांनी सभागृहाबाहेर पडून पत्रकारांशी बोलताना म्हटले की, आम्ही निवडून आलेले आमदार आहोत. मात्र आमचा ईव्हीएमला विरोध आहे. महायुतीला मिळालेला विजय हा जनतेचा कौल आहे की ईव्हीएमचा आहे? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. जनतेच्या मनात या निकालाबाबत संशय आहे. मविआचे नेते आदित्य ठाकरे आणि जितेंद्र आव्हाड यांनी हीच भूमिका मांडली. यानंतर मविआचे नेते उद्धव ठाकरे यांना भेटायला मातोश्रीवर पोहोचले. तिथे चर्चा झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी शरद पवार यांच्याशी फोनवर चर्चा केली. या चर्चेनंतर उद्धव ठाकरे यांनी आपल्या सर्व आमदारांना उद्या शपथविधी करून मगच आंदोलन करण्यास सांगितले. दरम्यान, विधान भवनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मविआच्या

पान २ वर




**नवीन निवडून आलेल्या आमदारांची शपथविधी प्रक्रिया पार पाडण्यासाठी आज विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले होते. मात्र आज पहिल्याच दिवशी मविआच्या नेत्यांनी अत्यंत बालिश आंदोलन केले. ईव्हीएमला विरोध करीत निषेध म्हणून मविआच्या नेत्यांनी शपथ घेण्यास नकार दिला आणि ते सभागृहाबाहेर निघून गेले.**

### शरद पवार आज मारकडवाडीत जाणार

बॅलेट पेपरवर मतदान घेऊन ईव्हीएमचे सत्य उघड करण्यासाठी सोलापूर जिल्ह्याच्या माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी या गावाने प्रयत्न केला होता. मात्र पोलिसांनी हा प्रयत्न हाणून पाडला. यामुळे हे गाव प्रकाशझोतात आले असून, या गावाच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी उद्या शरद पवार या गावात दाखल होणार आहेत. त्यांच्याबरोबर उद्धव ठाकरेही या गावी जाणार आहेत अशी चर्चा आहे.

### मविआत पहिल्याच दिवशी फूट

मविआचा एक भाग असलेली समाजवादी पार्टी आज मविआतून बाहेर पडली. बाबरी मशीद पाडणाऱ्यांचा पाठिंबा उबाठा गटाने दिला म्हणून आम्ही बाहेर पडत आहोत, असे कारण समाजवादी पार्टीचे नेते अबू आझमी यांनी दिले. मविआतून बाहेर पडल्याने मविआचा आदेश न मानता अबू आझमी आणि रईश शेख या दोन आमदारांनी आमदारकीची शपथही घेतली. त्याचबरोबर शरद पवार गटाचे आमदार बापूसाहेब पाठारे आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचे विनोद निकोले यांनीही मविआत असूनसुद्धा मविआचा आदेश न मानता आमदारकीची शपथ घेतली. यामुळे आनंदीत झालेल्या भाजपाने 'आगे आगे देखो होता है क्या' अशी प्रतिक्रिया दिली.

# मंदिर-मशिदीवरील भोंगे उतरवले उत्तर प्रदेशात योगींचा धडाका

■ लखनौ

**गेल्या** दोन दिवसांत लखनौ, पीलभीत अशा अनेक प्रमुख शहरांत धार्मिक स्थळांवरील भोंगे हटवण्यात आले. काही भोंग्यांचा आवाज कमी करायला लावला आहे. महाराष्ट्रात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अनेकदा मशिदींवरील भोंगे हटवण्याची मागणी केली आहे. परंतु महाराष्ट्रात अशी कारवाई करण्याची हिंमत अद्याप सरकारने दाखवली नाही. उत्तर प्रदेशात मात्र योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने भोंगे उतरवण्याची कठोर कारवाई सुरू केली आहे. या कारवाईला मुस्लीम समाजाने तोंडी विरोध केला, पण कुठेही कारवाई थांबली नाही.

पिलभित, लखनौ, कन्नोज आणि गोरखपूर शहरात पोलिसांनी कारवाई केली. कायद्यानुसार मान्य पातळीपेक्षा अधिक आवाज ज्या भोंग्यांचा होता ते भोंगे धडाधड उतरवले जात आहेत. पिलभितमध्ये आज १३३ भोंगे हटवले. अनेक ठिकाणी भोंग्याच्या ठरवून दिलेल्या संख्येपेक्षा अधिक भोंगे लावण्यात आले होते. काही भोंग्यांचा आवाजही अधिक असल्याने लोकांना त्याचा त्रास होत होता. पोलिसांनी हे भोंगे काढून सरकारी शाळांवर लावण्यासाठी ते शिक्षण विभागाला दिले आहेत.

**उत्तर प्रदेशातील पोलिसांनी आज मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कडक आदेशानंतर मंदिर, मशिदीवरील भोंगे उतरवण्यास सुरुवात केली आणि या मोहिमेला विरोध करण्याची हिंमत एकानेही केली नाही.**



पोलिसांनी भोंगे लावणाऱ्या धार्मिक स्थळांना इशारा दिला आहे की, भोंग्याचा वापर नियमानुसार करावा लागणार आहे. भोंग्याचा आवाज त्यांच्या परिसरापुरताच राहायला हवा. भोंग्यामुळे आजूबाजूच्या लोकांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्या.

सर्वोच्च न्यायालयाने ध्वनिप्रदूषणाबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार रहिवासी क्षेत्रात दिवसा ५५ आणि रात्री ४५ डेसिबलची मर्यादा आहे. परंतु धार्मिक स्थळे या मर्यादेचे उल्लंघन करतात. हेच कारण देत उत्तर प्रदेश पोलिसांनी ही कारवाई सुरू केली आहे. ही कारवाई सर्व धर्मांच्या धार्मिक स्थळांवर केली जात असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. मात्र मुस्लीम नेत्यांनी कारवाईला विरोध केला आहे. उत्तर प्रदेशातील विरोधी

पान २ वर

## थोडक्यात...

### अजित पवार गटात गुलाबराव देवकर जाणार

**जळगाव -** विधानसभा निवडणुकीत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही म्हणून गुलाबराव देवकर लगेचच शरद पवार यांची साथ सोडण्याच्या तयारीत आहेत. विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाचे गुलाबराव देवकर आणि शिंदे गटाचे गुलाबराव पाटील यांच्यात लढत झाली होती. त्यात देवकर यांचा पराभव झाला. त्यानंतर आता ५ हजार पेक्षा जास्त कार्यकर्ते आणि पदाधिकारी सोबत घेऊन गुलाबराव देवकर अजित पवार गटात उडी मारणार आहेत. देवकर यांनी स्वत: माहिती दिली. ते म्हणाले, विधानसभेत मिळालेल्या पराभवानंतर चिंतन बैठक झाली. त्यात सर्व स्थानिक कार्यकर्त्यांचा सत्तेत जाण्याचा सूर होता. त्यानंतर मी तटकरे यांची भेट घेतली. ९ डिसेंबरला अजित पवार यांची भेट घेऊन पक्षप्रवेश कधी आणि कुठे करायचा याबाबत निर्णय होईल.

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व चिन्ह सुनावणी १७ डिसेंबरला

**नवी दिल्ली -** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि घड्याळ हे पक्षाचे चिन्ह अजित पवार यांना देण्यात आले होते. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरुद्ध शरद पवार गटाकडून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आता या प्रकरणी सुनावणी आता १७ डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वेळापत्रकात ही संभाव्य तारीख नमूद करण्यात आली आहे.

### फेंगल वादळाचा परिणाम सिंधुदुर्गात पावसाच्या सरी

**ओरोस -** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही भागांत संध्याकाळच्या सुमारास पावसाच्या सरी कोसळल्या. फेंगल चक्रीवादळाचा हा परिणाम असल्याचे सांगण्यात येत आहे. या अवकाळी पावसामुळं नागरिकांची तारांबळ उडाली. कुडाळ, सावंतवाडी भागात ढगांच्या गडगडाटासह जोरदार पाऊस कोसळला. या पावसामुळे आंबा, काजू मोहरावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## धार्मिक स्थळ कायद्यासंबंधित याचिकांची सुनावणी सुप्रीम कोर्टात १२ डिसेंबरला

■ नवी दिल्ली

**धार्मिक** स्थळ अधिनियम १९९१ कायद्याला आव्हान देणाऱ्या सर्व याचिकांची सुनावणी येत्या १२ डिसेंबरला होणार असून, त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एका विशेष पीठाची स्थापना केली आहे. या विशेष पीठामध्ये सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्यासह न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती के. वी. विश्वनाथन यांचा समावेश आहे.



या विशेष पीठासमोर येत्या १२ डिसेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या विविध याचिकांची सुनावणी सुरू होईल. धार्मिक स्थळ अधिनियम १९९१ नुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी धार्मिक स्थळांची मालकी आहे, त्यांच्याकडेच राहील. कोणीही या स्थळाच्या स्वामित्वाला आव्हान देऊ शकत नाही त्याचप्रमाणे याबाबत न्यायालयातही जाऊ शकत नाही. देशातील अनेक याचिकाकर्त्यांनी या कायद्याच्या वैधतेला आव्हान दिले असून, त्यात काशी राजघराण्याच्या राजकन्या कुमारी कृष्णा प्रिया, भाजपा नेता सुब्रमण्यम स्वामी, माजी खासदार

पान २ वर

## पंतप्रधान मोदींना पुन्हा जीवे मारण्याची धमकी

■ मुंबई

**मुंबई** पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला आज पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हत्येचा कट रचला जात असल्याचा संदेश प्राप्त झाला आहे. या संदेशात म्हटले आहे की, प्रिन्स व इफान या नावाचा उल्लेख करून या व्यक्ती कंपनीमध्ये बेकायदा शस्त्रनिर्मिती करत आहेत. भारतीय लष्कराला उद्ध्वस्त करण्याच्या प्रयत्नात ते आहेत. प्रिन्स व इफान या दोन व्यक्तींपैकी एक धनबाद व दुसरा मुंबईमध्ये बॉम्बस्फोट घडवणार आहे. पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा आयएसआयसाठी हे संशयित काम करत आहेत. या संदेशाची मुंबई पोलिसांनी गंभीर दखल घेतली असून, तातडीने संदेश पाठवणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू केला आहे.

## दिल्ली जवळच्या परी चौकात आंदोलक शेतकऱ्यांना अटक

■ नवी दिल्ली

**भूमीअधिग्रहण** संबंधी नुकसानभरपाई व १० टक्के भूखंडाची मागणी करण्यासाठी दिल्लीच्या सीमेवर उत्तर प्रदेशातील ९ जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांनी चलो दिल्ली आंदोलन सुरू केले होते. २६ नोव्हेंबर रोजी नोएडाच्या सीमेवर त्यांनी आंदोलन केले. त्यानंतर दलित प्रेरणास्थळावरून आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना अटक करण्यात आली. या शेतकऱ्यांच्या सुटकेची मागणी करत आज शेतकऱ्यांनी परी चौकात जेलभरो आंदोलन केले. पोलिसांनी यावेळी ६० शेतकऱ्यांना अटक करून त्यांना लुकसर कारागृहात पाठवले.

आज शेतकऱ्यांनी परी चौकात आंदोलन केले. आज दुपारी १२ वाजता तुगलपूर गावातील हे शेतकरी परी चौकात पोहोचले. यावेळी तिथे पोलीस, आरपीएफसह मोठ्या प्रमाणात महिला पोलीसही तैनात होत्या. शेतकरी चौकात येताच त्यांना चारी बाजूने घेरण्यात आले व अटक करण्यात आली. या आधी दादरी येथील एनटीपीसी जवळच्या गावातील शेतकरीही परी चौकात पोहोचले. त्यांनाही अटक करण्यात आली. यावेळी पोलीस व आंदोलकांमध्ये धक्काबुक्कीही झाली. शेतकऱ्यांचे जेल भरो आंदोलन सुरुच राहणार असल्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## शक्तीपीठ महामार्गाविरोधात सांगलीत १८ डिसेंबरला रास्तारोको

■ सांगली

**प्रस्तावित** शक्तीपीठ महामार्गाबाबत विरोधी संघर्ष समिती पुन्हा आक्रमक झाली असून, आज झालेल्या समितीच्या बैठकीत या महामार्गाविरोधात १८ डिसेंबर रोजी सांगलीतील नागपूर-रत्नागिरी हायवेवर रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय झाला. हा महामार्ग रद्द होईपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धार या बैठकीत केला.

मुंबईत शपथविधी सोहळ्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्ग होणार असून, या महामार्गास नागपूरपासून सांगलीपर्यंत विरोध नाही. मात्र कोल्हापूरचा विरोध असल्याचे सांगितले. त्यांच्या या वक्तव्याचा सांगलीत शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीने निषेध केला. समितीचे समन्वयक गिरीश फोंडे यांनी पत्रकाद्वारे सांगितले की, हा महामार्ग रद्द होईपर्यंत लढा सुरुच राहील.

## इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची ममतांची इच्छा! काँग्रेसचा विरोध

■ नवी दिल्ली

**इंडिया** आघाडीचे नेतृत्व करण्याची इच्छा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केल्यानंतर त्याला समाजवादी पक्षाने पाठिंबा दिला आहे.



पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री व तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी एका मुलाखतीत म्हटले की मला इंडिया आघाडीचे नेतृत्व करायला आवडेल . त्यानंतर समाजवादी पार्टीने त्यांना पाठिंबा देत म्हटले की, त्यांच्या नेतृत्वामुळे इंडिया आघाडी मजबूत होईल. समाजवादी पार्टीचे राष्ट्रीय प्रवक्ते उदयवीर सिंह म्हणाले की, इंडिया आघाडीत ममता बॅनर्जी यांच्या प्रस्तावावर चर्चा व्हायला हवी. आमचा त्यांना शंभर टक्के पाठिंबा राहील. त्यांच्या नेतृत्वामुळे इंडिया आघाडी अधिक मजबूत होईल. ममता बॅनर्जी यांनी बंगालमध्ये भाजपाला रोखले आहे. त्यांच्याविषयी आम्हाला आदर आहे. हरियाणा व महाराष्ट्रात काँग्रेस सरकार बनवू शकले नाही. जर त्यांना अपेक्षित यश मिळाले नसेल तर त्याची जबाबदारी त्यांच्यावरच राहते. कम्युनिस्ट पार्टीनेही या मुद्यावरून काँग्रेसला टोला लगावला आहे.

पान २ वर

## उदयपूरच्या एकलिंगजी मंदिरात आता तोकड्या कपड्यांना बंदी

■ उदयपूर

**राजस्थानमधील** मेवाडचे दैवत अशी ओळख असलेल्या उदयपूरच्या प्राचीन एकलिंगजी मंदिरात



भाविकांना यापुढे तोकड्या कपड्यात प्रवेश करता येणार नाही. या मंदिरात मोबाईल फोन नेण्यालाही बंदी घालण्यात आली असून, मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मंदिर व्यवस्थापनाने म्हटले आहे.

मंदिर परिसरात मिनी स्कर्ट, बर्मुडा, नाईट सूट अशा प्रकारच्या कपड्यांवर बंदी केली आहे. या सूचनांचे फलक मंदिरात लावण्यात आले आहेत. कालपासून या नव्या नियमांची अंमलबजावणी करण्यात आली. एकलिंगजी मंदिर हे उदयपूर पासून २२ किलोमीटर दूर असलेल्या कैलासपुरी गावात असून, ते १७०० वर्षे जुने आहे.

पान २ वर






# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

प्रिंटर, फीडरमन आणि बॉयलर पाहिजे हायडलबर्ग ऑफसेटसाठी उल्हासनगर **9822340170** {NC243511}

आया, मावशी, वॉर्डबॉय, नर्स, ड्रायव्हर पाहिजेत. (राहणे+ खाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे- **9136404828** {NC243568}

सिक्युरिटी गार्ड/ हाऊसकिपींग, जेन्ट्स, लेडीज, पँट्री बॉय, वरळी, दादर, भायखळा, गोवंडी, माटुंगा जोगेश्वरी. **8291056761/ 8422880513** {NC243572}

अनुभवी स्क्रीन पेंटर पाहिजे, भायखळा घोडपदेव येथे. संपर्कः- **9152770426** {NC243581}

डोंबिवली मधील डॉट पेस्ट कंट्रोल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ह्या नामांकित कंपनी करीता अनुभवी आणि बिना अनुभवी टेक्निशियन हवे आहेत. संपर्क- **8652211111/ 7208453333** {NC243513}

Plants world नर्सरीसाठी अनुभवी माळी पाहिजेत. चर्नीरोड (E) **9920297466/ 8422982797** {NC243573}

नेपियन्सी रोड येथे लेडीज पार्लरसाठी लेडीज रिसेप्शनिस्ट हवी आहे, १०वी, १२वी अनुभवाची अट नाही **7977799201** {NC243554}

सिंधुदुर्ग मालवण येथे अनुभवी हॉटेल रिसेप्शनिस्ट, मॅनेजर, रूम बॉय, आचारी पाहिजे, राहण्याची, जेवणाची सोय, - **9423954861** {NC243611}

हेल्पर मुलगा पाहिजेत. कलश हॉल, परेल गांधी हॉस्पिटल जवळ. **8691962096** {NC243624}

दहिसर वेस्ट येथील ऑफीसमध्ये डिलीव्हरी, ऑफीस कामासाठी, हुशार २०-४० वर्षाचा, ॲक्टीवा चालवू शकणारा ऑफीसबॉय पाहिजे. **9819509040/ 9819881030** {NC243601}

नवीमुंबईमध्ये 24 तास घरकामासाठी मावशी पाहिजे (वयः 35 ते 55). पगारः 15,000/-. संपर्कः **8291221002** {NC243467}

## पाहिजेत

स्विमिंगपुल बनवण्यासाठी मुंबई, ठाणेयेथे अनुभवी प्लम्बर पाहिजेत पगार २०००० ते ३५००० इंटरव्यूसाठी कॉल - **9892510002** {NC243512}

## Situation Vacant

Free Homoeopathy pharmacy diploma course worli age 18 to 30-- **7738226352** {NC243548}

Computer Operators/ Sales Staff, X pass. **9987505459** {NC243622}

## कर्जविषयक

१-२ लाख पर्सनल लोन पाच दिवसात तसेच त्याहून अधिक ५० लाख पर्यंत लोन मिळेल. **8591923033** {NC243537}

## विकणे आहे

फिश बोट विकणे आहे किंवा इन्व्हेस्टर पाहिजे. संपर्क- **9004351097** {NC243604}

## जागा विकणे

२ गुंठ्यांचा एनए प्लॉट विकणे. ''म्हसा गाव'' मुरबाड. किंमतः १० लाख. रुपये. संपर्कः **8591331536** {NC243621}

## गुंतवणूकविषयक

गुंतवणुक (लघुउपयोग (गारमेंट) मध्ये गुंतवणुक करून दरमहा १ लाख नफा कमवा Offer- for limited period **9892073272** {NC243618}

## व्यसनमुक्ती

दारू सोडवा. दारू, तंबाखू, गुटखा सिगारेट औषधे उपलब्ध. डॉ.नागरगोजे **9765609769** {NC243583}

## वर पाहिजे


सुंदर वधु वय 29, उंची 5.3, शिक्षण 12वी, कपड्यांच्या दुकानात कामाला, वेतन- 12,000/-. मुलीला वडील नाहीत. अपेक्षा- निर्व्यसनी, समजुतदार, कष्टाळू **8446389460.** {NC243594}

नावं रुक्मिणी मांडवकर वय २८ शिक्षण अकरावी, घरगुती मेस चालवते. आई वडील नाही. भावाकडे राहते. शिक्षणाची अट नाही. (जात मराठा) **8432439087** {NC243620}

## विवाहविषयक

घटस्फोटीत हिंदू वर, कोकणस्थ माळी, श्रीवर्धन येथे स्थायिक, ३९, सावळा, 5" O', 10 वी पास, खाजगी नोकरी, अपेक्षा- कोकणस्थ माळी, मराठा, कुणबी, भंडारी, सुतार समाज चालेल, प्रथम वधू, घटस्फोटीत, विधवा चालेल, शिक्षण, नोकरीची अपेक्षा नाही. लग्न सोहळा मुंबई - **9930133735** {NC243570}


# खगोल भौतिक शास्त्रज्ञ व संसदसदस्य मेघनाद साहा





**खगोल भौतिक शास्त्रज्ञ व संसदसदस्य**

**मेघनाद साहा यांचा जन्म ६ ऑक्टोबर १८९३ ढाका जिल्ह्यातील सिओरात्तली (आता बांगला देश) येथे झाला. मेघनाद साहा यांनी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रफुलचंद्र रॉय व सर जगदीशचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊन १९१५ मध्ये एम्. एस्सी. आणि नंतर सापेक्षता सिद्धांत व प्रारण दाबाचे मापन या विषयांवर संशोधन करून पीएच. डी. पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी लंडनच्या इंपिरियल कॉलेजमध्ये संशोधन करून डी. एस्सी. पदवी मिळविली. ते कोलकाता विद्यापीठात भौतिकी विषयाचे खैरा प्राध्यापक (१९२१-२३), पलित प्राध्यापक (१९३८-५२) आणि गुणश्री प्राध्यापक (१९५२-५६) तसेच अलाहाबाद विद्यापीठात भौतिकीचे प्राध्यापक (१९२३-३८) होते.**

संजीव वेलणकर पुणे

साहा यांनी आणवीय सिद्धांत आणि पुंजयामिकी यांमधील तत्त्वांचा वापर करून तारकेय वर्णपटांच्या चित्रलिपीचा सांकेतिक अर्थ शोधून काढण्याकरिता सर्वप्रथम प्रयत्न केला. तारकेय वातावरणातील तापमानाला (६,०००ओ से. किंवा अधिक) ताऱ्याचे घटक असलेल्या पुष्कळशा अणूंच्या बाह्य कवचातील इलेक्ट्रॉन छेदले जातात. या आणवीय छेदन प्रक्रियेला इलेक्ट्रॉन गमावल्यामुळे आयनीकरण म्हणतात आणि छेदित अणूला आयन (विद्युत्भारित अणू)म्हणतात. अशा प्रकारे तारकेय वातावरणात मुक्त इलेक्ट्रॉन आणि छेदित अणू यांचे वायुमय मिश्रण असते. साहा यांनी या मिश्रणास वायूचा गत्यात्मक सिद्धांत आणि ऊष्मागतिकी यांचे नियम लावले. कोणत्याही मूलद्रव्याच्या अणुंकरिता छेदन किंवा आयनीभवन केवळ उच्च तापमानामुळे घडून येत नसून ते नीच दाबामुळे सुद्धा घडते, हे साहा यांनी सप्रमाण सिद्ध केले.

दाबातील न्यूनीकरणामुळे छेदन झाल्यानंतर उरलेला अणू आणि मुक्त इलेक्ट्रॉन यांची गाठ पडण्याची संधी अधिक कमी होते आणि पुनःसंयोग होण्याचा वेग कमी होऊन आयनीकरण वेग बदलत नाही. खाली दिलेले साहा समीकरण हे या कल्पनांचे गणितीय रूप आहे. मेघनाद साहा यांचे १६ फेब्रुवारी १९५६ रोजी निधन झाले.

# इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची ममतांची इच्छा! काँग्रेसचा विरोध

पान १ वरून

सीपीआयचे सरचिटणीस डी. राजा यांनी म्हटले की, हरियाणा व महाराष्ट्रात काँग्रेसने त्यांच्या सहयोगी पक्षांना सामावून घेतले नाही. काँग्रेसने सहयोगी पक्षांचे म्हणणे ऐकले असते तर लोकसभेप्रमाणेच निकाल लागला असता.

काँग्रेसने मात्र ममता बॅनर्जींच्या नेतृत्वाला आपला विरोध दर्शवला आहे. या वादात राष्ट्रीय जनता दलाचे नेते मृत्युंजय तिवारी यांनी म्हटले आहे की, इंडिया आघाडीची संकल्पना राजद प्रमुख लालुप्रसाद यादव यांची असून, त्यांनीच पटणा इथे विरोधी पक्षांची पहिली बैठक बोलावली होती. प्रत्येक पक्ष आपापल्या राज्यात भाजपाच्या विरोधात लढत असून, २०२५ मध्ये बिहारमध्ये आमच्यावर ती जबाबदारी आहे. इंडिया आघाडीमध्ये असलेला बेबनाव संसदेच्या हिवाळी अधिवेशनातही दिसून आला. अदानी लाचखोरी प्रकरणी काँग्रेसतर्फे करण्यात आलेल्या आंदोलनापासून तृणमूल काँग्रेस व समाजवादी पार्टीचे खासदार दूर राहिले आहेत.

# मंदिर-मशिदीवरील भोंगे उतरवले

पान १ वरून

पक्षांनीही सरकारवर या कारवाईवरून टीका केली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, पोलीस मुस्लिमांच्या प्रार्थनास्थळांवरच कारवाई करत आहेत. अनेक मशिदींमध्ये पोलीस पादत्राणे घालून घुसले आणि त्यांनी पावित्र्याचा भंग केला. या कारवाईमुळे सामाजिक सलोखाही बिघडत आहे. समाजवादी पक्षाचे प्रवक्ते तारीख खान म्हणाले आहे की, ध्वनिप्रदूषण होऊ नये म्हणून सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले असे म्हणत भोंग्यावर कारवाई करीत असतील तर फटाके वाजवण्याच्या बाबतीतही अशाच सूचना दिल्या होत्या. तेव्हा उत्तर परदेशातील भाजपा सरकारने सणाच्या वेळी फटाके वाजवण्याला मनाई नको असे म्हटले. फटाक्यांमुळे ध्वनि प्रदूषण झाले नाही का? त्यावेळी सुप्रीम कोर्टाचे आदेश मानायचे नसतात का?

भाजपाने यावर उत्तर दिले की, ध्वनिप्रदूषणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. अनधिकृत आणि मर्यादेपेक्षा जास्त आवाजात भोंगे वाजवणार्यांवरच कारवाई केली जात आहे. यात हिंदू- मुस्लीम भेद करण्याची गरज नाही. हिंदूंच्या मंदिरावरही कारवाई केली जात आहे. या कारवाईला धर्माच्या दृष्टीकोनातून पाहू नये.

# विना परवाना घुसलेल्या मासेमारी नौकांवर दंडात्मक कारवाई

रत्नागिरी

**मिरकरवाडा** समुद्रात विनापरवाना घुसलेल्या कर्नाटकच्या नौकेसह हर्णे, दाभोळ समुद्रात एलईडी दिवे वापरून मासेमारी करणाऱ्या नौका मालकांवर दंडात्मक कारवाई केली. यातील अलबहार नौका मत्स्य व्यवसाय विभागाने गेल्या १० दिवसांपासून मिरकरवाडा बंदरात रोखून ठेवली होती. या संदर्भात अधिकारी आनंद पालवांसमोर सुनावणी झाली. त्यांनी बंदर बदलण्याची परवानगी नसताना घुसखोरी करणाऱ्या या नौका मालकाला ३ लाख ४१ हजार तर एलईडी मासेमारी करणाऱ्यांना प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला.

# चप्पल आणि स्विमसूटवर गणपतीच्या फोटोमुळे वाद

वॉशिंग्टन

**ई-कॉमर्स** कंपनी वॉलमार्टच्या वेबसाईटवर हिंदू देवतांची चित्रे असलेली चप्पल आणि स्विम सूट विकण्यावरून खळबळ उडाली आहे. अमेरिकेत राहणाऱ्या हिंदू समाजाच्या लोकांनी यावर तीव्र आक्षेप घेतला.

हिंदू अमेरिकन फाऊंडेशनने वॉलमार्टवर धार्मिक भावनांचा अपमान केल्याचा आरोप करत या उत्पादनांची विक्री तातडीने थांबवण्याची मागणी केली आहे. त्यांनी वॉलमार्टला पत्र लिहून हिंदू भगवान श्रीगणेशाच्या प्रतिमेचा अयोग्य आणि अपमानास्पद वापर केल्याचे म्हटले आहे. वॉलमार्टनेही यावर कारवाईचे आश्वासन दिले. यानंतर वॉलमार्टने वेबसाइटवरून ही उत्पादने काढून टाकली. याबाबत माहिती देताना हिंदू अमेरिकन फाऊंडेशनने स्वतः वॉलमार्टचे आभार मानले आहेत. वॉलमार्ट कंपनीच्या वेबसाईटवर ही उत्पादने विकली जात असली तरी ती भारतात खरेदीसाठी उपलब्ध नव्हती.

# पहिल्या दिवशी बालिश आंदोलन! मविआ आमदारांनी शपथ घेतली नाही

## विधानभवन फेट्यांनी नटले

आज अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सर्वाधिक आमदार असलेल्या भाजपाने कोणतेही शक्तिप्रदर्शन केले नाही. मात्र एकनाथ शिंदे आणि त्यांचे सर्व आमदार यांनी भगवे फेटे घालून एकाच वेळी विधानभवन परिसरात प्रवेश केला. त्यांच्याप्रमाणेच शक्तिप्रदर्शन करीत अजित पवार आणि त्यांच्या ४१ आमदारांनी गुलाबी फेटे परिधान करून एकाच वेळी विधानभवनात प्रवेश केला.



पान १ वरून

बहिष्कारावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, नवीन आमदारांना शपथ घेण्यासाठी आज व उद्या हे दोनच दिवस आहेत. या आमदारांनी शपथ घेतली नाही तर नियमानुसार हे आमदार सोमवारी सभागृहात उपस्थित राहू शकणार नाहीत. ईव्हीएमबाबत विरोध करण्यात काहीच अर्थ नाही. लोकसभेत ते जिंकले तेव्हा त्यांनी ईव्हीएमला विरोध केला नाही आणि आता पराभूत झाल्यावर ईव्हीएमला विरोध करीत आहेत. विधान भवनात कामकाज सुरू असताना उद्धव ठाकरे यांना भेटून मविआचे आमदार आले. त्यानंतर जितेंद्र आव्हाड म्हणाले की, आम्हाला सकाळी ९ वाजता शपथ घेऊ नका, असा निरोप आला होता. आता शरद पवार जो निर्णय घेतील त्याप्रमाणे आम्ही उद्या वागू. ठाकरे गटाचे भास्कर जाधव म्हणाले की, आम्हाला उद्या शपथ घ्यावीच लागेल. उद्या शपथ घेतली नाही तर आम्हाला सभागृहात सहभागी होता येणार नाही. काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनीही हीच भूमिका घेतली. यामुळे आजचे आंदोलन हे बालिश आहे असे लक्षात आल्यावर मविआचे आमदार उद्या शपथ ग्रहण करतील हे उघड झाले आहे.


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतः:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- मॅनेजर, 'नवाकाळ'


# वांद्रेमध्ये टँकरच्या धडकेत २५ वर्षीय मॉडेलचा मृत्यू

**मित्र गंभीर जखमी**

मुंबई

**मित्राच्या** मोटारसायकलवरून प्रवास करत असताना समोरून येणाऱ्या भरधाव टँकरच्या धडकेत २५ वर्षीय मॉडेलचा मृत्यू झाला. शिवानी सिंह असे मृत्यू झालेल्या तरुणीचे नाव असून ती फिल्म इंडस्ट्रीत काम करायची आणि मालाड पश्चिम भागात राहत होती.

वांद्रे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवर पाण्याच्या टँकरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, शिवानी आणि तिचा मित्र गंभीर जखमी झाले. यानंतर स्थानिक लोकांनी त्यांना जवळच्या भाभा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी शिवानीला मृत घोषित केले. या घटनेनंतर टँकरचालक फरार झाला. वांद्रे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# आसामच्या बराक खोऱ्यातील हॉटेलांमध्ये बांगलादेशींना बंदी

दिसपूर

**आसामच्या** बराक खोऱ्याच्या हॉटेल व रेस्टॉरंट असोसिएशनने या भागातील हॉटेलांमध्ये बांगलादेशी नागरिकांना प्रवेश न देण्याचा निर्णय घेतला आहे. संघटनेचे अध्यक्ष बाबुल राय यांनी या निर्णयाची माहिती दिली असून बांगलादेशात होत असलेल्या हिंदूवरील अत्याचाराच्या विरोधात हा निर्णय घेण्यात आल्याचे म्हटले आहे. बाबुल राय यांनी म्हटले आहे की, बांगलादेशात हिंदू व अल्पसंख्याकांची स्थिती चिंताजनक आहे. बांगलादेशाच्या नागरिकांनी त्यांच्या देशात शांतता स्थापित करण्याकडे लक्ष द्यायला हवे. तिथली स्थिती सामान्य झाल्यावर आमच्या निर्णयाचा पुर्नविचार करू. बराक खोऱ्याच्या कछार, श्रीभूमी व हैलाकांडी या तीन जिल्ह्यात ही बंदी लागू करण्यात आली आहे.

# धार्मिक स्थळ कायद्यासंबंधित याचिकांची सुनावणी सुप्रीम कोर्टात १२ डिसेंबरला

पान १ वरून

चिंतामणी मालवीय, सेवानिवृत्त लष्करी अधिकारी अनिल कबोत्रा आदींचा समावेश आहे. याचिकाकर्त्यांचे असे म्हणणे आहे की, या अधिनियमामुळे हिंदू, जैन, बौद्ध व शिखांच्या अधिकारांचे हनन होत आहे. यामुळे अतिक्रमण करणाऱ्यांनी नष्ट केलेली धार्मिक स्थळे व तीर्थस्थळे पुन्हा मिळवण्यात अडचण येत आहे. या कायद्यामुळे धर्मनिरपेक्षता आणि कायद्याचे राज्य या संकल्पनांचेही उल्लंघन होत आहे. हा कायदा धार्मिक स्थळे व तीर्थस्थळाच्या व्यवस्थापन, देखभाल आणि प्रशासनाच्या अधिकारापासूनही वंचित ठेवत आहे.

दरम्यान, या विरोधात जमीयत-उलेमा-ए-हिंद या मुस्लीम संघटनेनेही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत हिंदू याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या याचिकांना आव्हान दिले आहे. या अधिनियमाला विरोध करणाऱ्या याचिकेची सुनावणी झाल्यास संपूर्ण देशातील अगणित मशिदींच्या विरोधात न्यायालयीन लढाया सुरू होतील, असे जमीयत-उलेमा-ए-हिंदचे म्हणणे आहे.

# उदयपूरच्या एकलिंगजी मंदिरात आता तोकड्या कपड्यांना बंदी

पान १ वरून

मंदिर व्यवस्थापनाने म्हटले आहे की, मंदिरात येणारे पर्यटक असभ्य कपडे परिधान करत असल्याची तक्रार अनेक भाविकांनी केल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. राजस्थान एक महत्त्वाचे पर्यटन क्षेत्र असल्याने इथे शेकडो देशी व परदेशी पर्यटक येत असतात. नव्या नियमानुसार भाविकांना मंदिरात मोबाईल फोन नेण्यासही बंदी घालण्यात आली आहे. याआधी मंदिरात मोबाईल फोन नेण्याची मुभा होती. मात्र छायाचित्रे काढण्यास प्रतिबंध होता. याबरोबरच मंदिरात कोणत्याही प्रकारचे पाळीव प्राणी व शस्त्रे नेण्यासही बंदी घालण्यात आली आहे. गेल्यावर्षी उदयपूर शहरातील जगदीश मंदिरातही असेच निर्बंध लावण्यात आले होते. त्यानंतर निर्माण झालेल्या वादामुळे सरकारच्या देवस्थान विभागाने ते फलक काढून टाकले होते.


## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 07/12/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 7244 | 5988 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 3653 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 0689 | 4306 श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | |
|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5383 पवार लॉटरी - ठाणे | 6263 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1163 | 3859 रुक्मणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद | 5068 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 6272 | 7485 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2132 | 2389 | 3491 | 4955 | 6388 | 6862 | 7342 | 8036 | 8310 | 9627 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1118 | 1155 | 2758 | 2814 | 4077 | 4583 | 5023 | 5802 | 8365 | 9214 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0507 | 1766 | 2571 | 3373 | 3991 | 5142 | 6007 | 7161 | 7980 | 8928 |
| | 0648 | 1781 | 2577 | 3375 | 4048 | 5355 | 6093 | 7172 | 8017 | 9029 |
| 0005 | 0688 | 1840 | 2629 | 3394 | 4074 | 5359 | 6199 | 7253 | 8048 | 9122 |
| 0027 | 0701 | 1852 | 2680 | 3404 | 4148 | 5369 | 6219 | 7286 | 8069 | 9146 |
| 0037 | 0967 | 1911 | 2715 | 3436 | 4247 | 5375 | 6241 | 7324 | 8127 | 9259 |
| 0064 | 1018 | 1958 | 2812 | 3438 | 4410 | 5435 | 6344 | 7338 | 8196 | 9359 |
| 0080 | 1024 | 2027 | 2920 | 3535 | 4414 | 5457 | 6434 | 7436 | 8201 | 9413 |
| 0090 | 1031 | 2062 | 3002 | 3559 | 4424 | 5534 | 6522 | 7449 | 8213 | 9524 |
| 0116 | 1106 | 2078 | 3032 | 3582 | 4446 | 5537 | 6637 | 7703 | 8288 | 9598 |
| 0130 | 1141 | 2162 | 3036 | 3610 | 4472 | 5560 | 6651 | 7704 | 8329 | 9743 |
| 0180 | 1148 | 2192 | 3132 | 3653 | 4548 | 5571 | 6663 | 7705 | 8359 | 9813 |
| 0207 | 1173 | 2201 | 3163 | 3659 | 4687 | 5595 | 6664 | 7708 | 8446 | 9818 |
| 0240 | 1193 | 2209 | 3252 | 3672 | 4850 | 5647 | 6668 | 7779 | 8478 | 9819 |
| 0241 | 1358 | 2229 | 3253 | 3759 | 4915 | 5704 | 6713 | 7807 | 8482 | 9836 |
| 0305 | 1415 | 2322 | 3260 | 3763 | 5035 | 5715 | 6773 | 7823 | 8608 | 9854 |
| 0340 | 1468 | 2375 | 3264 | 3781 | 5055 | 5728 | 6924 | 7860 | 8618 | 9871 |
| 0404 | 1677 | 2399 | 3332 | 3814 | 5094 | 5805 | 7019 | 7871 | 8753 | 9945 |
| 0480 | 1718 | 2452 | 3334 | 3889 | 5121 | 5846 | 7057 | 7900 | 8827 | 9966 |
| 0490 | 1748 | 2458 | 3367 | 3937 | 5135 | 5953 | 7126 | 7939 | 8909 | 9985 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी — सोडत दर शनिवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 49 — सोडत दिनांक 07/12/2024

| | |
|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | ML-07 : 1387 |
| उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 1387 — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; सुमित एजन्सी - मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1884 | 2176 | 2479 | 3813 | 5389 | 5610 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2131 | 3218 | 4397 | 6201 | 6412 | 6452 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2065 | 2350 | 2688 | 5123 | 5726 | 6016 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1750 | 1968 | 2033 | 2067 | 5579 | 6698 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1798 | 2380 | 2802 | 3322 | 3661 | 4014 | 4461 | 4949 | 5459 | 5852 | 6290 | 6666 |
| | | 1813 | 2385 | 2822 | 3323 | 3667 | 4028 | 4480 | 5005 | 5473 | 5859 | 6306 | 6674 |
| 1003 | 1371 | 1814 | 2389 | 2826 | 3331 | 3678 | 4029 | 4484 | 5020 | 5475 | 5890 | 6326 | 6682 |
| 1011 | 1381 | 1882 | 2400 | 2877 | 3346 | 3683 | 4043 | 4493 | 5027 | 5488 | 5895 | 6328 | 6693 |
| 1020 | 1399 | 1891 | 2420 | 2884 | 3348 | 3687 | 4062 | 4547 | 5033 | 5495 | 5901 | 6347 | 6695 |
| 1031 | 1407 | 1909 | 2423 | 2889 | 3354 | 3699 | 4094 | 4574 | 5038 | 5505 | 5907 | 6363 | 6696 |
| 1038 | 1409 | 1931 | 2426 | 2903 | 3367 | 3703 | 4116 | 4594 | 5043 | 5509 | 5911 | 6379 | 6714 |
| 1042 | 1411 | 1936 | 2432 | 2920 | 3369 | 3707 | 4141 | 4604 | 5050 | 5520 | 5921 | 6393 | 6746 |
| 1051 | 1419 | 1938 | 2442 | 2961 | 3374 | 3736 | 4142 | 4644 | 5058 | 5538 | 5947 | 6396 | 6763 |
| 1053 | 1429 | 1987 | 2469 | 2972 | 3375 | 3751 | 4147 | 4667 | 5075 | 5545 | 5948 | 6397 | 6765 |
| 1058 | 1450 | 2000 | 2471 | 3031 | 3378 | 3770 | 4154 | 4671 | 5078 | 5549 | 5954 | 6398 | 6767 |
| 1084 | 1470 | 2012 | 2492 | 3032 | 3380 | 3778 | 4194 | 4674 | 5083 | 5551 | 5958 | 6446 | 6787 |
| 1100 | 1499 | 2017 | 2526 | 3050 | 3381 | 3781 | 4195 | 4676 | 5089 | 5556 | 5965 | 6452 | 6816 |
| 1101 | 1513 | 2019 | 2543 | 3073 | 3389 | 3793 | 4206 | 4683 | 5099 | 5567 | 6005 | 6457 | 6828 |
| 1110 | 1515 | 2020 | 2595 | 3075 | 3396 | 3801 | 4213 | 4692 | 5100 | 5570 | 6008 | 6466 | 6846 |
| 1114 | 1531 | 2021 | 2625 | 3084 | 3399 | 3816 | 4223 | 4711 | 5155 | 5588 | 6046 | 6491 | 6849 |
| 1128 | 1572 | 2022 | 2626 | 3106 | 3408 | 3827 | 4234 | 4718 | 5157 | 5605 | 6055 | 6495 | 6860 |
| 1140 | 1581 | 2033 | 2631 | 3112 | 3413 | 3832 | 4244 | 4724 | 5166 | 5611 | 6063 | 6508 | 6862 |
| 1145 | 1583 | 2044 | 2632 | 3133 | 3434 | 3833 | 4245 | 4742 | 5179 | 5618 | 6064 | 6517 | 6870 |
| 1146 | 1597 | 2051 | 2638 | 3135 | 3450 | 3837 | 4246 | 4743 | 5191 | 5625 | 6066 | 6522 | 6876 |
| 1157 | 1640 | 2071 | 2653 | 3142 | 3466 | 3838 | 4280 | 4746 | 5205 | 5633 | 6081 | 6560 | 6880 |
| 1158 | 1651 | 2110 | 2660 | 3143 | 3476 | 3853 | 4282 | 4747 | 5254 | 5646 | 6099 | 6566 | 6886 |
| 1168 | 1655 | 2125 | 2671 | 3166 | 3478 | 3876 | 4307 | 4748 | 5259 | 5692 | 6103 | 6568 | 6898 |
| 1170 | 1656 | 2148 | 2672 | 3170 | 3480 | 3878 | 4379 | 4750 | 5262 | 5697 | 6106 | 6577 | 6905 |
| 1173 | 1665 | 2204 | 2682 | 3193 | 3483 | 3883 | 4389 | 4774 | 5275 | 5702 | 6177 | 6578 | 6906 |
| 1198 | 1678 | 2210 | 2690 | 3204 | 3488 | 3888 | 4414 | 4800 | 5277 | 5705 | 6179 | 6592 | 6916 |
| 1222 | 1704 | 2211 | 2691 | 3214 | 3513 | 3900 | 4421 | 4804 | 5303 | 5751 | 6186 | 6607 | 6917 |
| 1246 | 1712 | 2266 | 2692 | 3233 | 3521 | 3912 | 4422 | 4832 | 5352 | 5755 | 6202 | 6609 | 6927 |
| 1269 | 1716 | 2272 | 2708 | 3246 | 3536 | 3930 | 4428 | 4834 | 5357 | 5764 | 6206 | 6615 | 6936 |
| 1281 | 1717 | 2284 | 2713 | 3254 | 3575 | 3932 | 4441 | 4844 | 5382 | 5769 | 6211 | 6623 | 6960 |
| 1296 | 1718 | 2287 | 2720 | 3269 | 3577 | 3933 | 4443 | 4848 | 5391 | 5785 | 6214 | 6628 | 6965 |
| 1297 | 1746 | 2294 | 2729 | 3283 | 3580 | 3934 | 4445 | 4879 | 5399 | 5809 | 6224 | 6629 | 6973 |
| 1307 | 1747 | 2313 | 2741 | 3293 | 3589 | 3938 | 4447 | 4882 | 5400 | 5811 | 6225 | 6637 | 6984 |
| 1321 | 1761 | 2348 | 2762 | 3298 | 3630 | 3963 | 4454 | 4922 | 5431 | 5813 | 6265 | 6649 | 6986 |
| 1359 | 1778 | 2360 | 2770 | 3306 | 3632 | 3964 | 4457 | 4942 | 5441 | 5834 | 6275 | 6655 | 6994 |
| 1361 | 1780 | 2361 | 2773 | 3316 | 3659 | 3973 | 4460 | 4946 | 5452 | 5847 | 6285 | 6661 | 6996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी — सोडत संध्या. 5:00

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 07/12/2024

| | |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10000/- | MG-08 : 8910 — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 7801 — किशोर लॉटरी सेंटर, सांगली |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1170 | 2766 | 7613 सिराज एन्टरप्रायझेस, नागपूर | 7742 ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे | 8965 अंबिका एजन्सी, दादर, मुंबई |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| चौथे बक्षिस रु. 400/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1789 | 2944 | 4034 | 4942 | 5785 | 6211 | 6684 | 7973 |
| 1064 | 2025 | 3080 | 4129 | 5020 | 5837 | 6214 | 6706 | 8187 |
| 1105 | 2056 | 3303 | 4233 | 5167 | 5854 | 6460 | 7377 | 8223 |
| 1122 | 2165 | 3320 | 4318 | 5375 | 5855 | 6492 | 7464 | 8393 |
| 1251 | 2174 | 3351 | 4484 | 5379 | 5992 | 6510 | 7486 | 8628 |
| 1449 | 2222 | 3359 | 4772 | 5395 | 6015 | 6516 | 7617 | 8683 |
| 1515 | 2621 | 3369 | 4895 | 5521 | 6070 | 6559 | 7700 | 8716 |
| 1586 | 2797 | 3632 | 4903 | 5526 | 6132 | 6676 | 7710 | 8843 |
| 1691 | 2842 | 3852 | 4926 | 5596 | 6166 | 6679 | 7847 | 8850 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • प्रभालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 07/12/2024

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SP-02 : 2206 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | |
|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3623 — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3496 | 5333 पवार लॉटरी - ठाणे | 5538 पवार लॉटरी - ठाणे |

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1126 | 2696 | 3489 | 4496 | 5110 |
| 2127 | 2933 | 3574 | 4531 | 5176 |
| 2396 | 3083 | 3831 | 4748 | 5330 |
| 2408 | 3089 | 3839 | 4804 | 5355 |
| 2429 | 3220 | 4092 | 4843 | 5383 |
| 2584 | 3266 | 4304 | 4844 | 5605 |
| 2620 | 3385 | 4310 | 5064 | 5668 |
| 2630 | 3468 | 4427 | 5089 | 5685 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी



# बांगलादेशात हिंदू धोक्यात




**इस्कॉनचे धर्मगुरू चिन्मय कृष्ण दास यांच्या अटकेमुळे हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवरील हल्ल्यांच्या संदर्भात जगाचे लक्ष बांगलादेशाकडे वळले आहे. जगभरात विविध स्तरांवर याची दखल घेण्यात येत आहे. हिंदू आणि इतर अल्पसंख्याकावरील हल्ल्याबाबत ताबडतोब कारवाई करण्याचे आवाहन भारताने बांगलादेशच्या अंतरिम सरकारला केले आहे तर बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस म्हणत आहेत की हे हल्ले धार्मिक स्वरूपाचे नसून राजकीय स्वरूपाचे आहेत. बांगलादेशच्या घटनेने अल्पसंख्याकांना सभा स्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे अधिकार दिले आहेत परंतु हे घटनाच बदलण्याचे प्रयत्न होत आहेत.**

**काय घडले?**

चिन्मय कृष्ण दास प्रभू हे बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांमधील मोठे व्यक्तिमत्व मानले जाते. हल्लीच्या काळात हिंदूंवर होत असलेल्या हल्ल्याविरुद्ध आवाज उठवण्यात ते नेहमीच अग्रेसर असतात. चिन्मय कृष्ण दास यांचे खरे नाव चंदनकुमार धर आहे. ते चितगाव इस्कॉनचे प्रमुख आहेत. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांची हकालपट्टी झाल्यावर हिंदूंवर मोठ्या प्रमाणात हल्ले झाले. यानंतर बांगलादेशी हिंदू व इतर अल्पसंख्यांक यांच्या रक्षणासाठी सनातन जागरण मंचची स्थापना करण्यात आली. चिन्मय दास त्याचे प्रवक्ते बनले. सनातन जागरण मंचाच्या चितगाव आणि रंगपूरमध्ये अनेक सभा झाल्या. या सभांना मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहत होते. या सभांमधून चिन्मय दास भाषणे करत होते. २१ ऑक्टोबर रोजी सनातन जागरण मंचने चितगाव येथील लालदिघी मैदानावर रॅली काढली. रॅलीसमोर चिन्मय दास यांनी भाषण केले. यावेळी मार्केट चौकातील आजादी स्तंभावर काही लोकांनी बांगलादेशाच्या राष्ट्रध्वजावर 'आम्ही सनातनी' असे लिहिलेला भगवा ध्वज फडकवला. रॅलीनंतर ३१ ऑक्टोबर रोजी बेगम खलिदा झिया यांच्या बीएनपी पक्षाचे नेते फिरोज खान यांनी चितगावमध्ये चिन्मय कृष्ण दास व आणखी १८ जणांवर राष्ट्रध्वजाचा अपमान आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला. २५ नोव्हेंबर रोजी चिन्मय दास यांना अटक झाली. न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज नाकारला. यावेळी न्यायालयाच्या बाहेर चिन्मय दास यांचे हजारो समर्थक जमले होते. जामीन नाकारल्याचे कळताच बाहेर हिंसाचार उसळला. त्यात वकील सैफुल इस्लाम यांचा मृत्यू झाला. सैफुल इस्लाम यांच्या हत्येमागे इस्कॉनच्या लोकांचा हात असल्याने या संघटनेवर बंदी घालण्याची मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. परंतु ढाका उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली. बांगलादेशच्या अंतरिम सरकारने न्यायालयात सांगितले की त्यांनी इस्कॉनच्या प्रकरणी आवश्यक ती पावले उचलली आहेत व या प्रश्नाला सरकार प्राधान्य देत आहे. यानंतर चिन्मय दास यांच्यावरील देशद्रोहाच्या खटल्यात त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रमण रॉय या वकिलावर हल्ला करण्यात आला. त्यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्या घराचीही मोडतोड करण्यात आल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. जानेवारी २०१३ ते सप्टेंबर २०२३ या दरम्यान हिंदू समुदायावर किमान ३६७१ इतके हल्ले झाल्याची सरकार दरबारी नोंद आहे. शेख हसीना यांनी देश सोडल्यावर तर या हल्ल्यांमध्ये खूपच वाढ झाली आहे.

**भारताने घेतली दखल**

बांगलादेशमधील इस्कॉनच्या धर्मगुरूंना देशद्रोहाच्या आरोपावरून झालेली अटक आणि हिंदू व इतर अल्पसंख्याकावरील हल्ल्यात झालेली मोठ्या प्रमाणातील वाढ यामुळे साऱ्या जगाचे लक्ष बांगलादेशकडे वळले आहे. ब्रिटिश संसदेत या प्रश्नांविषयी चर्चा झाली. अमेरिकेनेही या हल्ल्यांबद्दल चिंता व्यक्त केली. बांगलादेशाच्या पदच्युत नेत्या शेख हसीना यांनी अल्पसंख्याकावरील हल्ल्यासाठी तर थेट बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनाच जबाबदार धरले आहे. न्यूयॉर्कमधील एका परिषदेत ऑनलाईन बोलताना हसीना यांनी आरोप केले की बांगलादेशात शिक्षक आणि पोलिसांवर हल्ले करून त्यांची हत्या केली जात आहे. हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चनांना लक्ष्य केले जात आहे. या सामूहिक हत्याकांडाचे मोहम्मद युनूस आणि त्यांचे लोकच सूत्रधार आहेत.

भारतातही इस्कॉनच्या धर्मगुरूंच्या अटकेच्या निषेधार्थ ठिकठिकाणी निदर्शने केली जात आहेत. जगभरातील दहशतवादी कारवायांमध्ये इस्कॉनचा सहभाग असल्याच्या आरोपांचा इस्कॉनने ठामपणे इन्कार केला असून या आरोपांना त्यांनी निराधार आणि अस्वीकार्य म्हटले आहे, तसेच त्यांनी भारताला चिन्मय दास यांच्या सुटकेसाठी त्वरित कारवाई करण्याची विनंती केली आहे. भारताच्या परराष्ट्र




मंत्रालयाने देखील बांगलादेशातील घडामोडींची दखल घेऊन जाहीर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की चिन्मय कृष्णदास यांना अटक व जामीन नाकारल्याची आम्ही गंभीरपणे दखल घेतली आहे. ही घटना बांगलादेशातील अतिरेकी घटकांकडून हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवर झालेल्या अनेक हल्ल्यानंतर घडते आहे. आम्ही बांगलादेशच्या अधिकाऱ्यांना हिंदू आणि सर्व अल्पसंख्याकांच्या शांततापूर्ण सभा स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारासह सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे आवाहन करत आहोत.

**मोहम्मद युनूस यांची भूमिका**

एकेकाळी बांगलादेशच्या लोकसंख्येत सुमारे २० टक्के असलेला हिंदू समुदाय आता ९ टक्क्यांवर आला आहे. अनेक दशके बांगलादेशातील हिंदू समुदाय शेख हसीना यांच्या आवामी लीग पार्टीला समर्थन देत होता. याचे कारण शेख हसीना यांची प्रतिमा ही धर्मनिरपेक्ष अशी होती तर त्यांच्या विरोधकांमध्ये कट्टरपंथी इस्लामिक पार्टीचाही समावेश होता. शेख हसीना यांच्या विरुद्धच्या जनआंदोलनाने पेट घेतल्यावर त्यांनी भारतात आश्रय घेतला. बांगलादेशात अंतरिम सरकार स्थापन झाले. या अंतरिम सरकारचे प्रमुखपद मोहम्मद युनूस यांच्याकडे देण्यात आले. मोहम्मद युनूस यांना २००६ साली त्यांच्या ग्रामीण बँकेच्या संकल्पनेबद्दल आणि कार्याबद्दल सर्वोच्च असे शांततेचे नोबल परितोषिक मिळाले आहे. एकीकडे मोहम्मद युनूस यांची उदारमतवादी प्रतिमा जगासमोर असतानाच शेख हसीना पायउतार होताच बांगलादेशामधील हिंदू अल्पसंख्याकांवरील हल्यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. हे हल्ले तोडफोड, जाळपोळ आणि लक्षित हिंसाचाराने प्रेरित होते. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकार अल्पसंख्याकांवरील आणि हसीना यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांवरील हल्ले रोखण्यात सपशेल अयशस्वी ठरल्याचे आरोप जगभरातून होऊ लागले. एका आठवड्यापूर्वी मोहम्मद युनूस यांनी आपल्या सरकारवर होत असलेल्या हिंसक दंगली रोखण्यात अयशस्वी ठरल्याचे आरोप नाकारले. त्यांनी दावा केला की केवळ काही प्रकरणांमध्येच अल्पसंख्याकांविरुद्ध हिंसाचार झालेला आहे आणि बहुतेक तक्रारी पूर्णपणे अतिशयोक्तिपूर्ण आहेत युनूस यांनी टीव्हीवरून राष्ट्राला संबोधित करताना म्हटले की बांगलादेशातील हिंसाचार हा राजकीय हेतूने प्रेरित आहे. सप्टेंबर महिन्यात दिलेल्या मुलाखतीत युनूस यांनी म्हटले होते की हिंदूंवरील हल्ले हे सांप्रदायिक नाहीत तर ते राजकीय उलथापालथीचे परिणाम आहेत. याचे कारण बहुतेक हिंदूंनी आतापर्यंत कायमच पदच्युत झालेल्या अवामी लीग पक्षाच्या सरकारला पाठिंबा दिला होता. मी हे पंतप्रधान मोदींना देखील सांगितले आहे की या समस्येला अनेक बाजू आहेत. तेव्हा हे हल्ले राजकीय स्वरूपाचे आहेत जातीयवादी किंवा धार्मिक नाहीत.

**बांगलादेशची घटना काय म्हणते?**

१९४७ साली धर्माच्या नावाखाली पाकिस्तानची निर्मिती झाली. २५ वर्षातच पाकिस्तानची फाळणी होऊन बांगलादेशाची निर्मिती झाली. या नव्या देशाची निर्मिती पाकिस्तानप्रमाणे धर्माच्या आधारावर न होता उलट ती धर्मनिरपेक्ष आणि उदारमतवादी बांगला राष्ट्रवादावर आधारित होती. ४ नोव्हेंबर १९७२ रोजी बांगलादेशने घटनेचा स्वीकार केला. घटनेच्या प्रस्तावनेत राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता या चार मूलभूत तत्वांचा उल्लेख आहे. तथापि जरी बांगलादेशी मूळ घटना धर्मनिरपेक्ष असली तरी १९७७ ला लष्करी हुकूमशहा झिया उल रहमान याने घटनेतील धर्मनिरपेक्ष शब्द हटवला आणि १९८८ साली जनरल इर्शाद याने इस्लाम हा राष्ट्रधर्म असेल हे कलम घटनेत घुसडले. पुढे २०१० साली सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले की जरी इस्लाम हा राष्ट्रधर्म असला तरी घटना ही धर्मनिरपेक्षच राहील आणि ३० जून २०११ रोजी धर्मनिरपेक्षता हा शब्द घटनेत पुन्हा समाविष्ट करण्यात आला. देशाच्या कोणत्याही नागरिकाच्या बाबतीत धर्म, जात, वंश, लिंग किंवा जन्मस्थान यावरून भेदभाव करण्यात घटनेने मज्जाव केला. कोणत्याही धार्मिक समुदायाला त्यांच्या धार्मिक संस्थांची स्थापना, देखभाल आणि व्यवस्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला.

त्यानंतर आता पुन्हा म्हणजे १३ नोव्हेंबर २०२४ रोजी बांगलादेशचे ॲटर्नी जनरल मोहम्मद असदुज्जमा यांनी देशाच्या संविधानातून धर्मनिरपेक्ष आणि समाजवाद हे शब्द वगळण्याचा सल्ला दिला आहे. काही लोकांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय देताना ॲटर्नी जनरल म्हणाले की धर्मनिरपेक्षता सारखे शब्द बांगलादेशचे खरे चित्र उभे करत नाहीत कारण येथे ९० टक्के जनता मुस्लीम आहे.

**भारताने दाखवलेली काळजी...**

बांगलादेशमधील हिंदू मंदिरांची नासधूस आणि चिन्मय कृष्ण दास यांना झालेली देशद्रोहाच्या आरोपाखालील अटक या दोन्ही गोष्टी केवळ बांगलादेशच्या घटनेने दिलेल्या अधिकारांचेच उल्लंघन करीत नाहीत तर त्या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्याही विरोधातील आहेत. मानवाधिकार हा कोणत्याही एका देशाचा अंतर्गत व्यवहार असू शकत नाही. त्यामुळेच बांगलादेशमधील अल्पसंख्याकांच्या अधिकारांच्या होत असलेल्या उल्लंघनाच्या बाबतीत भारताने दाखवलेली काळजी ही एका देशाने दुसऱ्या देशाच्या अंतर्गत व्यवहारात केलेली ढवळाढवळ होत नाही. अर्थात भारताने दाखवलेल्या काळजीच्या संदर्भात बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिलेले उत्तर निराशजनक आहे. जे देश आपल्या देशातील अल्पसंख्याकांच्या अधिकारांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाला ज्याप्रमाणे उत्तर देतात तसेच उत्तर बांगलादेशनेही दिले आहे.

बांगलादेशात सुमारे २ कोटी अल्पसंख्याक आहेत. यात हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध आणि अहमदिया यांचा समावेश आहे. भारत आणि नेपाळ नंतर हिंदूंची तिसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक लोकसंख्या बांगलादेशातच आहे. अशा परिस्थितीत जर बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस हिंदू अल्पसंख्याकांवरील हल्ले हे राजकीय स्वरूपाचे असून धार्मिक स्वरूपाचे नाहीत अशी भूमिका घेऊन अल्पसंख्याकांवर इस्लामी बहुसंख्याकांकडून होणाऱ्या अत्याचाराबाबत काहीच पावले उचलत नसतील तर ती चिंतेची बाब आहे. बांगलादेशच नव्हे तर कोणत्याही देशातील अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात सरकार काहीच पावले उचलत नसेल तर ते निश्चितच निषेधार्ह आहे. बांगलादेशच्या घटनेत ज्या प्रकारे धार्मिक अल्पसंख्याकांना अधिकार दिले आहेत, त्याचे पालन करून अल्पसंख्याकांवरील हल्ले ताबडतोब थांबवणे आणि अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेची हमी घेणे हे सध्याच्या अंतरिम सरकारचे तातडीचे काम ठरणार आहे.

नवा काळ



# हो, मी आहे चिल गाय!

**सोशल मीडियावर लोकांना कधी काय आवडेल याचा नेम नाही. कधी एखादे गाणे, कधी एखादा नाच तर कधी एखादे विनोदी मीम लोकांना इतके आवडते की ते काही क्षणात व्हायरल होते. सध्या असेच एक मीम सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहे. या मीमचे नाव आहे 'चिल गाय मीम.' या मीमचा वापर मोठमोठे ब्रँड्स आणि सेलिब्रिटीही सध्या करत आहेत. 'चिल गाय मीम'नेमके काय आहे, या मीमची इतकी चर्चा का?**

**आजची तरुणाई एकमेकांशी मीम्सच्या भाषेतच बोलते. मीम्समधून भावभावना, विनोद, उपहास सगळे काही शेअर करता येते. आपल्या परिस्थितीला, संवादाला चपखल बसणाऱ्या मीमचा फोटो किंवा व्हिडिओ पाठवला की संवाद अधिक मजेदार बनतो. सध्या चिल गाय मीम तरुणाईचे सगळ्यात आवडते मीम बनले आहे. आजच्या धकाधकीच्या आयुष्यातील विसंगती दाखवायला उपरोधानेही काही जण हे मीम शेअर करत आहेत.**

## कसा दिसतो चिल गाय?

राखाडी रंगाचा स्वेटर, पाय दुमडलेली निळी जीन्सची पँट, लाल रंगाचे स्नीकर्स बूट, दोन्ही हात खिशात घालून, चेहऱ्यावर एक हलकीशी हास्याची लकेर असणाऱ्या माणसारख्या दिसणाऱ्या एका तपकिरी रंगांच्या कुत्र्याचे हे मीम आहे. त्याची देहबोली आणि चेहऱ्यावरचे हावभाव यांच्यावर एक वेगळीच बेफिकिरी आहे आणि याच वैशिष्ट्यामुळे त्याचे नामकरण 'चिल गाय' असे करण्यात आले आहे. फिलिप बँक्स नावाच्या कार्टूनिस्ट, इलस्ट्रेटरने या पात्राचा फोटो पहिल्यांदा शेअर केला. या फोटोखाली त्याने लिहिले होते हे आहे माझे नवीन पात्र. हा चिल गाय आहे, त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या कोणत्याच गोष्टींनी त्याला फार फरक पडत नाही, आसपास घडणाऱ्या घटनांचा त्याच्यावर फारसा परिणामही होत नाही, एकूणच आयुष्यात तो निवांत आहे. त्याचे बेफिकीर जगणे हेच त्याचे वैशिष्ट्य आहे.

## कलाकृतीचा जनक कोण?

फिलिप बँक्स यांची चिल गाय ही कलाकृती मीम म्हणून व्हायरल झाली खरी पण गंमत अशी की फिलिप बँक्स हे या कलाकाराचे खरे नाव नाही. त्याचे खरे नाव काय किंवा तो कसा दिसतो हे कोणालाच माहीत नाही. या कलाकाराला आपले खरे नाव किंवा ओळख जगासमोर आणायची नाही. स्वत:बद्दल अधिक तपशील न देता, बँक्सने एका सोशल मीडिया पोस्टवर लिहिले की माझा जन्म ८ एप्रिल रोजी झाला आहे, मी नॉर्थ कॅरोलिनाचा आहे. माझे खरे नाव फिलिप नाही किंवा ते फिलिप बँक्स नाही, परंतु तुम्ही मला प्रेमाने या नावाने हाक मारू शकता. चिल गाय मीम व्हायरल झाल्यानंतर चाहते याच नावाने कलाकाराला संबोधू लागले आणि चिल गाय मीमचा जनक म्हणून फिलिप बँक्स हेच टोपणनाव प्रसिद्ध झाले.

## चिल गायचे क्रिप्टो कनेक्शन



आजकाल झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग म्हणून अनेक जण क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करू लागले आहेत. या व्यवहारासाठी वापरण्यात येणारी क्रिप्टो करन्सी म्हणजे आभासी चलनाची नेहमीच चर्चा असते. हे मीम व्हायरल झाल्यानंतर चक्क 'चिलगाय' नावाचे क्रिप्टोकरन्सी टोकन जारी करण्यात आले. विशेष म्हणजे 'डॉजकॉइन' आणि 'शिबा इनू' सारख्या इतर 'मीम कॉइन्स'ना या चिल गायने मागे टाकले. १५ नोव्हेंबरपासून त्याचे मूल्य ५० कोटी यूएस डॉलर्सपर्यंत वाढले होते, २६ नोव्हेंबरला मात्र ते ४४ कोटींपर्यंत खाली घसरले. आपल्या कलाकृतीचा वापर बिटकॉइनसारखा करत असल्याने नाराजी व्यक्त करत फिलिप्स बँक्स यांनी त्यांच्या चित्रावर कॉपीराइट प्राप्त केला आहे आणि ते अनधिकृतरित्या चित्र वापरल्याबद्दल कायदेशीर कारवाई करणार आहेत.

## नेटकऱ्यांची कल्पकता...

सोशल मीडियावरील हजारो व्हिडीओमध्ये चिल गाय हे पात्र म्हणून वापरण्यात आले आहे किंवा त्याचा संदर्भ तरी दिला गेला आहे. उदाहरणार्थ तुम्हाला तुमच्या बायकोने सकाळीच एखादे महत्त्वाचे काम सांगितले आहे आणि तुम्ही ते विसरला आहात म्हणून ती तुमच्यावर खेकसत आहे पण तुम्ही शांत आहात कारण तुम्ही दिवसाचा प्रत्येक क्षण आनंदात जगणारे चील गाय आहात किंवा सर्वजण तुम्हाला दारुडे म्हणून नावे ठेवत आहेत पण तुम्ही तर फक्त दारूवर प्रेम करणारे चिल गाय आहात अशा आशयाचे बरेच मीम्स सध्या चील गायचा फोटो वापरून व्हायरल झाले आहेत.

# एफबीआयच्या संचालकपदी भारतीय वंशाचे कश पटेल...

**अमेरिकेतील 'फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन'च्या (एफबीआय) संचालकपदी एका भारतीय वंशाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती झाली आहे. एफबीआयचे नवे संचालक म्हणून कश पटेल यांच्या नावाची घोषणा नुकतीच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. या निवडीमुळे भारतीय वंशाच्या आणखी एका व्यक्तीला अमेरिकेच्या प्रशासनातील एका प्रमुख पदावर काम करण्याची संधी मिळत आहे.**

**कोण आहेत कश पटेल?**

कश्यप पटेल म्हणजेच कश पटेल यांचे आई-वडील मूळचे गुजरातमधील बडोद्याचे. कश यांच्या जन्माआधी नोकरीनिमित्ती पटेल दाम्पत्य अमेरिकेत स्थलांतरित झाले. कश यांचा जन्म न्यूयॉर्कमध्ये झाला. त्यांनी रिचमंड विद्यापीठात कला शाखेत पदवीपूर्व शिक्षण घेतले. घरात राजकीय वातावरण नसले तरी कॉलेजमध्ये मात्र त्यांना राजकीय वारे लागले. त्यांच्यावर उजव्या विचारसरणीचा प्रभाव पडला आणि ते महाविद्यालयीन पातळीवरच्या निवडणुकांमध्ये सहभाग घेऊ लागले. कला शाखेत पदवी मिळवल्यानंतर पुढे त्यांनी कायद्याचे शिक्षण घ्यायचे ठरवले. युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनमधून आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रमाणपत्र मिळवल्यानंतर पेस विद्यापीठातून त्यांनी कायद्याची पदवी मिळवली. त्यानंतर गुन्हेगारी न्याय विषयाचा अभ्यास करून त्यांनी काही काळ वकिली केली.

**महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांची धुरा...**

ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात कश पटेल यांनी राष्ट्रीय सुरक्षा परिषदेत काम केले आहे तसेच ते अमेरिकेचे कार्यवाहक संरक्षण सचिव क्रिस्टोफर मिलर यांच्या संरक्षण मंत्रालयात कार्यालयीन प्रमुख म्हणूनही कार्यरत होते. याआधी कश यांनी राष्ट्रीय सुरक्षा परिषदेत राष्ट्राध्यक्षांचे उपसहाय्यक म्हणून तसेच दहशतवादविरोधी विभागात वरिष्ठ संचालक म्हणून आपली जबाबदारी पार पाडली आहे. संरक्षण विभागानुसार, ट्रम्प यांच्या कार्यकाळात पटेल यांनी अनेक मोठ्या मोहिमांमधून महत्त्वाची भूमिका बजावली होती.

**संवेदनशील मोहिमा...**

कश पटेल यांच्याच कार्यकाळात आयसीसचे प्रमुख अल बगदादी आणि अल कायदाचे कासिम अल रिमी मारले गेले. अमेरिकेतील पत्रकारांसह काही ओलिसांच्या सुटकेसाठी करण्यात आलेल्या वाटाघाटींमध्ये पटेल सहभागी होते. त्यांच्या नेतृत्वाखाली असंख्य अमेरिकन ओलिसांना सुरक्षित मायदेशी परत आणण्यात आले.



**ट्रम्प आणि कश पटेल भेट**

कायद्याची पदवी मिळवल्यानंतर कश यांनी 'पब्लिक डिफेन्डर' म्हणून काम करण्यास सुरुवात केली. स्थानिक आणि फेडरल न्यायालयामध्ये त्यांनी जवळपास नऊ वर्षे काम केले. या दरम्यान ज्यूरी ट्रायल्समध्ये खुनापासून ते नार्को ड्रग्स-तस्करी आणि गुंतागुंतीच्या आर्थिक गुन्ह्यांपर्यंत अनेक जटिल खटले त्यांनी चालवले. त्यानंतर ते न्याय विभागात रुजू झाले. तीन वर्षांनंतर पटेल यांना व्हाईट हाऊसमधील कर्मचारी म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांनी हाऊस पर्मनंट सिलेक्ट कमिटी ऑन इंटेलिजन्ससाठी काम केले. ही समिती रिपब्लिकन पक्षाचे प्रतिनिधी आणि ट्रम्प यांचे निकटवर्तीय मानले जाणाऱ्या डेव्हिन नुनेस यांच्या नेतृत्वाखाली काम करत होती. २०१६मध्ये ट्रम्प यांच्या निवडणुकीत रशियाच्या हस्तक्षेपाचे आरोप झाले होते आणि ही समिती याच मुद्द्यावर काम करत होती. या समितीने सादर केलेल्या 'नुनेस मेमो' या चार पानी अहवालामध्ये अमेरिकेतील न्याय विभागाच्या चुका तपशीलवार मांडण्यात आल्या होत्या. यावेळी पटेल यांनी रिपब्लिकन पक्षाला मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या मेमोने ट्रम्प यांचे लक्ष वेधून घेतले आणि पटेल यांनी लवकरच राष्ट्रीय सुरक्षा परिषदेत काम करण्यास सुरुवात केली.

**बहुआयामी व्यक्तिमत्त्व...**

कश पटेल हे त्रिशूल नावाची कंपनी चालवतात. ते 'कश फाउंडेशन' नावाची स्वयंसेवी संस्था चालवतात. ही स्वयंसेवी संस्था लष्करी कर्मचारी आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत पुरवते. ही संस्था अमेरिकन मुलांच्या शिक्षणासाठी आणि व्हिसल ब्लोअर्सच्या मदतीसाठी असणाऱ्या शिष्यवृत्तीवर पैसे खर्च करते.

कश पटेल लेखकही आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. गेल्यावर्षी त्यांचे 'गव्हर्नमेंट गँगस्टर: द डीप स्टेट, द ट्रुथ अँड द बॅटल फॉर अवर डेमोक्रसी' हे आत्मवृत्त प्रकाशित झाले. त्यांनी मुलांच्या काल्पनिक कथांचे लेखनही केले आहे. 'द प्लॉट अगेन्स्ट द किंग' या पुस्तकामध्ये ट्रम्प यांचे वर्णन सिंह म्हणून केले आहे तर खलनायकाच्या भूमिकेत हिलरी क्लिंटन यांचे चित्रण आहे.

एकूणच, डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणाचे कट्टर पुरस्कर्ते अशी ओळख असणारे कश पटेल आता त्यांच्यावर दिलेली जबाबदारी कसे पार पाडतात हे येणारा काळच ठरवेल.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# अन्यथा मुंबई टर्मिनसचेच शहर होईल

**महाराष्ट्रात** नवे सरकार आल्यानंतर जो काही राज्यकारभार होईल तो होईलच परंतु तो जनतेला प्रत्यक्ष दिलासा देणारा असला पाहिजे यात काही शंका नाही. ज्या महाराष्ट्राचा प्रगतीशील राज्य म्हणून वारंवार उल्लेख होतो त्या प्रगतीशीलतेसाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची अजूनही पूर्तता झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. देशाची आर्थिक राजधानी मुंबई असूनही तिथे राहणाऱ्या सामान्य माणसाच्या मूलभूत गरजांची पूर्तता हादेखील असाच दूर्लक्षित विषय ठरतो. त्या तुलनेमध्ये उत्तरप्रदेशसारखे राज्य जिथे देशातील सर्वाधिक जास्त विमानतळं आहेत. मुंबई ही आंतरराष्ट्रीय दर्जाची नगरी मानली जाते. पण तिथे आजच्या घडीला एकच आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. उत्तरप्रदेश पाच आंतरराष्ट्रीय विमानतळं आहेत हे ऐकून क ोणालाही आश्चर्य वाटेल. परंतु अनेक वर्षे केंद्रात सर्वाधिक खासदार निवडून देण्याचे काम उत्तरप्रदेशमधून होत आले आणि त्या त्या राजकीय नेत्यांनी आपापल्या मतदार संघाचा विकास घडवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. असाच दुसरा मोठा आश्चर्याचा भाग म्हणजे आज देशातील सर्वाधिक रेल्वे प्रवासी हे रोज मुंबईत प्रवास करतात. जवळपास दीड लाख प्रवासी रोज उपनगरीय रेल्वेचा वापर करतात. परंतु आतापर्यंत या उपनगरीय रेल्वेबाबत कमालीची उदासिनता दाखवली गेली. गर्दीने ठासून भरलेल्या लोकलमध्ये स्वतःला कोंबून घेण्याशिवाय मुंबई आणि परिसरातील रेल्वे प्रवाशांना पर्याय नसतो. रेल्वेची सगळी मुख्यालये मुंबईत आहेत. पण प्रवाशांच्या मुख्य समस्यांबाबतच रेल्वे खाते मुकस्तंभासारखे काम करीत राहिले. उत्तर प्रदेशमध्ये देशातील सर्वाधिक रेल्वे स्थानकं आहेत. पण प्रवाशांची संख्या लक्षात घेतली तर मुंबई आणि महाराष्ट्राला रेल्वे संदर्भात सर्वाधिक सुविधा मिळणे गरजेचे आहे. आतादेखील पंतप्रधानांनी मुंबईला जगाचे आर्थिक केंद्र करण्याचे म्हटले आहे. ते त्यांनी जरूर करावे. परंतु याचा दुसरा अर्थ असा होतो की मुंबईकडे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी अशा आर्थिक नजरेतूनच पाहिले जाते.

**मुंबईकडे दुर्लक्ष**

आज या आंतरराष्ट्रीय महानगराची राज्याच्या राजधानीची किंवा देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या शहराची अवस्था सुखावह नाही ही वस्तुस्थिती आहे. आज जागोजागी टोलेजंग इमारतींची जंगले उभी राहत आहेत. मोकळ्या करून घेण्यात आलेल्या गिरण्यांच्या जमिनींवर सगळ्या धनाढ्य चौकडीने आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. जी मुंबई एकेकाळी चाळ संस्कृती आणि मराठमोळ्या स्वभावामुळे स्वतःचे एक अस्तित्व टिकवून होती ती चाळसंस्कृती आता लयाला जात आहे. म्हणजेच तिथे राहणारा सर्वसामान्य माणूस मुंबईबाहेर फेकला जातो आहे. जगाचे मोठे आर्थिक केंद्र करीत असताना सामान्य माणसाला राहण्याचे जगातले एकमेव सुखाचे आणि सोयीचे शहर म्हणून जर मुंबईचा नावलौकिक निर्माण करता आला तर तो देखील तितकाच योग्य ठरू शकतो. परंतु आता मूळ मुंबईतली गर्दी आणि जागेची कमतरता लक्षात घेऊन अन्य पर्यायांचा विचार करण्याशिवाय केंद्र आणि राज्याला पर्याय उरलेला दिसत नाही आणि म्हणूनच आंतरराष्ट्रीय विमानतळ रायगड जिल्ह्यात तर सर्वात मोठे रेल्वे टर्मिनस आता वसईमध्ये उभारण्याची घोषणा झाली आहे. याशिवाय पश्चिम रेल्वेवर जोगेश्वरी टर्मिनसचेही काम वेगाने सुरू आहे. एकूणच पश्चिम रेल्वेवर मुंबई सेंट्रल, परळ, दादर, बांद्रा, आता जोगेश्वरी आणि भविष्यातील वसई ही टर्मिनसची निर्मिती पाहिली तर पश्चिम रेल्वेवर दीडशे किलोमीटरच्या आत जवळपास सहा टर्मिनसचा विक्रमही नोंदला जाऊ शकतो. याशिवाय मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, कुर्ला टर्मिनस, प्रस्तावित ठाणे टर्मिनस आणि कल्याणलादेखील टर्मिनस बनवण्याशिवाय पर्याय राहणार नाही. मध्यंतरीच्या काळात विक्रोळीला मोठे टर्मिनस करायचे मध्य रेल्वेने म्हटले होते. पनवेल टर्मिनस जवळपास अस्तित्वात आलेले आहे. म्हणजे एकूण मुंबई आणि त्यांच्या पंचक्रोशीतले रेल्वेचे जाळे पाहिजे. तर मुंबई हे सर्वाधिक रेल्वे टर्मिनसचे महानगर म्हणूनही नावारूपाला येऊ शकते. परंतु या सगळ्या सुधारणा वीस वर्षांपूर्वीच होणे अपेक्षित होते. वसई टर्मिनसची निर्मिती करताना वसईपर्यंत पोहचण्याकरीता अन्य प्रवासी मार्गाचा विचार होणे खूप आवश्यक ठरते.

**...तरच अन्याय दूर होईल**

आज एकूणच पश्चिम रेल्वे मार्गावर असणारी गाड्यांची संख्या आणि प्रवाशांची तुडुंब गर्दी या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर अशा उपाययोजनांची किती गरज होती हे स्पष्ट होते. भविष्यकाळात पालघर जिल्ह्यात सर्वात मोठे वाढवण बंदर कार्यान्वित होईल. तिथे रोजगाराच्या निमित्ताने लोकसंख्येत वाढ होईल. काही विकासप्रकल्प गृहित धरून त्याच भागामध्ये पुन्हा एका आणखी आंतरराष्ट्रीय विमानतळाची मागणी केलेली आहे. पंतप्रधानांनी ती तत्वतः मान्यही केलेली दिसते. या सगळ्या विकासाच्या योजना राबवत असताना सामान्य माणसाची सोय केंद्रस्थानी असली पाहिजे. अन्यथा गर्दीवरचा एक तात्पुरता उपाय म्हणून या सगळ्या कामांकडे पाहिले जाईल. मुंबई हे केवळ टर्मिनसचे महानगर होऊ नये. यातून देशाच्या अर्थकारणाला गती देणाऱ्या सामान्य माणसाच्या हिताला प्राधान्य मिळणे तितकेच गरजेचे ठरते. प्रगतीशील राज्य असूनही रेल्वे किंवा अन्य दळणवळणाच्याबाबतीत मुंबई, महाराष्ट्र दुर्लक्षित राहिले ही वस्तुस्थिती आहे. सर्वात आधी कोलकाता आणि दिल्लीला मेट्रो मिळाली. त्यानंतर मुंबईचा नंबर लागला. म्हणजे मुंबईची गरज असूनही तिला सतत नाराज केले गेले. सर्वाधिक आर्थिक उत्पन्न देणाऱ्या या मुंबई आणि महाराष्ट्रावरचा हा अन्याय दूर करण्याची तत्परता नव्या सरकारने दाखवली पाहिजे. महाराष्ट्र थांबणार नाही अशी केवळ घोषणा न देता तो वेगाने पुढे सरकतो आहे हे जोपर्यंत लोकांना जाणवत नाही तोपर्यंत आपल्यावरचा हा अन्याय दूर झाला असेदेखील वाटणार नाही.


**सुविचार**

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**माणसाने वेळेबरोबर चालावे. काळाप्रमाणे बदलावे, पण संस्कारांना शेवटपर्यंत आपल्याबरोबर सांभाळावे.**

**पंचांग**

रविवार, ८ डिसेंबर, २०२४
शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर
मार्गशीर्ष शुक्ल सप्तमी
नक्षत्र : शततारका



रवी उदय- ०७-०१
रवी अस्त- १८-००

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० कुंभ

**भानु सप्तमी, संत रोहिदास म. पुण्यतिथी, श्रीभालचंद्र महाराज पुण्यतिथी कणकवली**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



# पाककृती

## ओला वाटाणा ढोकळा



★ **साहित्य** :- १ वाटी ओले वाटाणे, १ वाटी शिळा भात, १ वाटी रवा, १ वाटी दही, चवीप्रमाणे मीठ, १ इनो पॅकेट, १ चमचा राई, तीन-चार हिरव्या मिरच्या, १ पळी तेल, थोडी कोथिंबीर, १/२ चमचा हिंग.

★ **कृती** :- प्रथम एक वाटी वाटाणे मिक्सरमध्ये जाडसर वाटून घ्यावे. ते एका प्लेटमध्ये टाकून घ्यावे.

त्याच मिक्सरच्या भांड्यात भात टाकून बारीक वाटून घ्यायचा. बारीक झाल्यावर त्यात एक वाटी दही व एक वाटी रवा घालावा. पुन्हा एकदा मिक्सरमध्ये वाटून घ्यायचे. हे मिश्रण वाटलेल्या वाटाण्याच्या मिश्रणात टाकून सर्व मिश्रण एकजीव करून पंधरा ते वीस मिनिटे झाकून ठेवावे. २० मिनिटांनंतर त्यात इनो घालावा व चांगले फेटून घ्यावे. ढोकळ्याच्या भांड्याला थोडे तेल लावून त्यात ते मिश्रण सगळे ओतावे व सात ते आठ मिनिटे फास्ट गॅसवर वाफवून घ्यावे.

ढोकळा थंड झाल्यावर त्याचे आपल्याला पाहिजे तसे तुकडे करून घ्यावे. फोडणीचे भांडे गॅसवर ठेवून तेल घालावे. तेल गरम झाल्यावर राई, मिरच्याची व हिंगाची फोडणी करावी व ती फोडणी कापलेल्या ढोकळ्यावर घालून वरून कोथिंबीर घालावी. हा झाला मटार ढोकळा खाण्यासाठी तयार.



# ऑस्ट्रेलियन संघाची कसोटीवर पकड घट्ट
# दुसऱ्या डावातही भारतीय फलंदाज फ्लॉप



**ऑडलेड कसोटीत आज दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताने दुसऱ्या डावात ५ गडी गमावून १२८ धावा केल्या. भारतीय संघ अजूनही २९ धावांनी मागे असल्यामुळे ऑस्ट्रेलियाने कसोटीवर आपली पकड घट्ट केली आहे. भारताच्या दुसऱ्या डावात सध्या रिषभ पंत २८ धावा आणि नितीश कुमार रेड्डी १५ धावा करून नाबाद परतले आहेत. ऑस्ट्रेलियाकडून आतापर्यंत पॅट कमिन्स आणि स्कॉट बोलँडने प्रत्येकी दोन बळी घेतले, तर मिचेल स्टार्कला एक विकेट मिळाली.**

■ ॲडलेड

पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियाने १ गडी गमावून ८६ धावा केल्या होत्या. भारताची दुसऱ्या दिवसाची सुरुवात चांगली झाली. भारतीय गोलंदाजांनी नॅथन मॅकस्विनी आणि स्टीव्ह स्मिथ यांना लवकरच पॅव्हेलियनमध्ये धाडले. मार्नस लाबुशेनने ६४ धावांचे योगदान दिले. मात्र ट्रेव्हिस हेड पुन्हा एकदा भारतासाठी डोकेदुखी ठरला. त्याने १४१ चेंडूत १४० धावा ठोकल्या. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील आठवे शतक ठरले. ट्रेव्हिस हेडच्या शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३३७ धावा केल्या. परिणामी ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात भारतावर १५७ धावांची आघाडी घेतली होती. सलामीवीर यशस्वी जयस्वाल आणि के. एल. राहुल यांनी भारताच्या दुसऱ्या डावाची सुरुवात केली.

राहुल अवघ्या ७ धावा करून बाद झाला. त्याच्याशिवाय विराट कोहली केवळ ११ धावा करू शकला. जयस्वाल आणि शुबमन गिल यांनी अनुक्रमे २४ आणि २८ धावा केल्या. या दोघांनाही सुरुवात मिळाली होती. परंतु ते त्याचे मोठ्या खेळीत रुपांतर करण्यात अपयशी ठरले. विराट कोहलीने फक्त ११ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मा क्रीजवर आल्यापासून संघर्ष करताना दिसला. त्याला पॅट कमिन्सने ६ धावांवर क्लीन बोल्ड केले. भारतीय फलंदाजांना चांगली कामगिरी करता न आल्यामुळे आज दिवसाअखेर भारताने ५ बाद १२८ धावा केल्या.

## सन्मित्र मंडळ, नवरत्न संघाची विजयी सलामी

■ मुंबई

**मुंबई** उपनगर जिल्हा कबड्डी संघटनेने चारकोपच्या संयोजन संस्थेच्या सहकार्याने कांदिवली, सेक्टर-२ येथील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर आयोजित केलेल्या मुंबई उपनगर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेच्या प्रथम श्रेणी पुरुषांत सन्मित्र मंडळ आणि नवरत्न क्रीडा संघाने दुसरी फेरी गाठली. श्री साई मंडळ कुमारी गटात, तर जय लहुजी संघ कुमार गटात तिसऱ्या फेरीत दाखल झाला.

द्वितीय श्रेणीतून प्रथम श्रेणीत बढती मिळालेल्या सन्मित्रने संकल्प प्रतिष्ठानला रोखत दुसरी फेरी गाठली. सोहम पुंदे, प्रथमेश शेळके यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. संकल्पचे ऋत्विक राबाडे, केतन रामाणे बरे खेळले. याच गटात नवरत्न - अ ने टागोर नगर -ब संघाचा सहज पाडाव केला. यश डोंगरे, विजय माईन यांच्या चतुरस्त्र खेळाने हे शक्य झाले. टागोर नगरचा रूद्र चक्रवर्ती चमकला. सत्यम सेवाने तरुण मंडळ उचाटचा पराभव केला. यतीन वाडेकर, शुभम जोंधळे यांच्या उत्कृष्ट खेळाने सत्यमने हा विजय साकारला. कुमार गटात जय लहूजी मंडळाने शिवराय प्रतिष्ठानचा कडवा प्रतिकार मोडून काढत तिसरी फेरी गाठली. सुशील सिंग, ओंकार चिकणे जय लहूजीकडून,तर हर्ष गावंडे, रोहित माने शिवराय प्रतिष्ठानकडून उत्तम खेळले.

## न्यूझीलंड पराभवाच्या छायेत इंग्लंडची ५३३ धावांची आघाडी

**वेलिंग्टन-** वेलिंग्टनच्या बेसिन रिझर्व्हमध्ये सुरू असलेल्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी इंग्लंडने दुसऱ्या डावात ५ बाद ३७८ धावा केल्या. त्यामुळे न्यूझीलंडवर ५३३ धावांची आघाडी घेतली. परिणामी न्यूझीलंड संघ पराभवाच्या छायेत आला आहे. इंग्लंडने पहिल्या डावात २८० धावा केल्या होत्या. प्रतिउत्तरात न्यूझीलंड १२५ धावाच करू शकला. इंग्लंडचा गोलंदाज गस टकिन्सनने आपल्या गोलंदाजीने न्यूझीलंडचा कहर केला. टकिन्सनने हॅट्ट्रिक घेत ३ वर्षांनी कसोटी क्रिकेटमधील हॅट्ट्रिकचा दुष्काळ मोडला. यासह हॅट्ट्रिक घेणारा तो इंग्लंडचा १५ वा गोलंदाज ठरला. टकिन्सनने ८.५ षटकांत ३१ धावा देत एकूण ४ विकेट्स घेतल्या.

## महर्षी दयानंद आणि आंबेडकर महाविद्यालयाला अजिंक्यपद

■ मुंबई

**५१ वी** आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या (कै.एम.एन.वर्मा फिरता चषक व कै. सुमती अंकूश मालकर फिरता चषक) अंतिम सामन्यात मुलांमध्ये डॉ. आंबेडकर महाविद्यालयाने आणि मुलींमध्ये महर्षी (एमडी)दयानंद महाविद्यालयाने (ब संघ) विजेतेपद मिळवले.

मुलांच्या अंतिम सामन्यात डॉ. आंबेडकर महाविद्यालयाने एसएसटी महाविद्यालयाचा २४-२० असा ४ गुणाने पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या सामन्यात आंबेडकर महाविद्यालयाच्या आकाश साळवी, जितेंद्र यादव यांनी चढाईमध्ये चमकदार कामगिरी केली व सनी भगतने उत्कृष्ट पकड करत संघाला विजेतेपद मिळवून दिले. तर पराभूत एसएसटीच्या चिन्मय गुरख, रोहन कनोजीया यांनी





चढाईमध्ये व सिद्धेश पांचाळने छान पकड करत आपल्या संघाला विजय मिळवून देण्यासाठी जोरदार संघर्ष केला. मात्र ते यशस्वी होऊ शकले नाहीत. मुलींच्या अंतिम सामन्यात महर्षी दयानंद महाविद्यालयाच्या 'ब' संघाने त्यांच्याच म्हणजे महर्षी दयानंद महाविद्यालयाचा (अ संघ)२८-२६ असा दोन गुणांनी पराभव करत विजेतेपदावर नाव कोरले. या सामन्यात महर्षी दयानंदच्या रिया मडकईकर, नेहा गुप्ता यांनी सामन्यात जोरदार कामगिरी करत विजय खेचून आणला तर उपविजेत्या महर्षी दयानंदच्या (अ संघ) रितीका फूलसुर्गे, अदिती शिंदे, उर्जा साळगावकर यांनी दिलेली लढत पराभवापासून वाचवू शकली नाही.

## कसोटीत इंग्लंडचा विक्रम ५ लाख धावांचा आकडा गाठला

■ लंडन

कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडने ५ लाख धावांचा आकडा गाठला असून, हा विक्रम करणारा इंग्लंड हा जगातील पहिला संघ ठरला आहे. हा आकडा गाठण्यासाठी इंग्लंडला एकूण १०८२ कसोटी आणि ७१७ खेळाडूंची मदत लागली.

इंग्लंड संघाने १८७७ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिली कसोटी खेळली होती. जागतिक क्रिकेटमध्ये सर्वाधिक कसोटी सामने खेळणारा संघही इंग्लंड आहे. अतिरिक्त धावांचा समावेश केल्यास इंग्लंड संघ ५ लाख ३२ हजार धावांच्या जवळ आहे. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक धावा करणारा दुसरा संघ ऑस्ट्रेलिया आहे.

## पय्याडे स्पोर्ट्स क्लबच्या विजयात माहीची चमक

■ ठाणे



**कर्णधार** माही ठक्करच्या अष्टपैलू खेळामुळे पय्याडे स्पोर्ट्स क्लबने भारत क्रिकेट क्लबचा तीन विकेट्सनी पराभव करत डॉ. राजेश मढवी स्पोर्ट्स असोसिएशन आणि दैवेज्ञ क्रिकेट क्लब आयोजित पाचव्या अर्जुन मढवी स्मृती महिला एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत आगेकूच केली. भारत क्रिकेट क्लबचे १८३ धावांचे आव्हान पय्याडे क्रिकेट क्लबने ७ फलंदाजांच्या मोबदल्यात ३१.५ षटकांत १८४ धावांसह पार केले.

यष्टीरक्षक आणि सलामीवीर धनश्री वाघमारे, कर्णधार केतकी धुरेने भारत क्रिकेट क्लबच्या धावसंख्येला आकार दिला. केतकीने ५३ धावांची अर्धशतकी खेळी केली. तर धनश्रीने ३८ आणि श्रुतिका पाटीलने २२ धावा केल्या. दिशा लोटेने ३, क्रितीका यादवने २, माही ठक्कर, जिया मांदरवडकर आणि रिद्धी कोटेचाने प्रत्येकी एक बळी मिळवला. माफक आव्हानाचा पाठलाग करताना पय्याडे स्पोर्ट्स क्लबची अडखळत सुरुवात झाली. सुरुवातीच्या पडझडीनंतर माही ठक्करने सूत्रे आपल्या हाती घेत प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर हल्लाबोल केला. तिने ४२ चेंडूंत १२ चौकार आणि ३ षटकार ठोकत ७६ धावा करत संघाला विजयाचा दरवाजा उघडला. ललिता यादवने २६ आणि आश्लेषा बरारने नाबाद २१ धावा करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

## झुनझुनवाला आणि एसएसटी महाविद्यालयाला विजेतेपद

■ मुंबई

**लालबागच्या** पेरू कंपाऊंड, मनोरंजन मैदान येथे महर्षी दयानंद महाविद्यालयातर्फे पार पडलेल्या ४२ वी आंतर महाविद्यालयीन खो-खो (मुले व मुली) स्पर्धेत मुलांचे विजेतेपद झुनझुनवाला महाविद्यालयाने तर मुलींचे विजेतेपद एसएसटी महाविद्यालयाने मिळवले. मुलांच्या अंतिम सामन्यात झुनझुनवाला महाविद्यालयाने डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचा एक गुणाने पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या सामन्यात झुनझुनवालाच्या प्रथमेश दुर्गावले (४.३० मि. संरक्षण व १ गुण), सदाशिव पालव (२ मि. संरक्षण व २ गुण), धिरज भावे (३.२० मि. संरक्षण व १ गुण), शुभम शिंदे (३.३० मि. संरक्षण व २ गुण) यांनी दमदार खेळ केला. आंबेडकरच्या राहुल जावळे, अथर्व पाष्टे, ओंकार मिरगळ, हर्षे कामतेकर यांनी चांगली चमक दाखवली.



मुलींच्या अंतिम सामन्यात एसएसटी महाविद्यालयाने एसएनडीटी महाविद्यालयाचा सहज पराभव केला. एसएसटीच्या कल्याणी कंक (२ मि.संरक्षण व ५ गुण), मिना कांबळे (१ मि. संरक्षण व १ गुण), काजल शेख (नाबाद ३.३० मि. संरक्षण व ४ गुण), किशोरी मोकाशी (२ मि.संरक्षण व २ गुण) यांनी शानदार खेळ केला. पराभूत एसएनडीटीच्या खुशबू सूतार, रिया कदम, आर्या तावडे व नम्रता पांडे यांनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. मुलांच्या तृतीय क्रमांकाच्या सामन्यात एसएसटी

**आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धा**

महाविद्यालयाने किर्ती महाविद्यालयाचा पराभव केला. एसएसटीच्या ऋषीकेश चोरगे, प्रवीण मसकर, विकास डोंगरे, निखील कदम यांनी विजयात मोलाची कामगिरी केली. किर्ती महाविद्यालयाच्या ओमू भरणकर, तन्मय भुवड, सिद्धार्थ चव्हाण, प्रतिक होडावडेकर यांनी दिलेली लढत अपुरी ठरली.



# सुख शांती समाधान

**मार्गशीर्ष पौर्णिमा शनिवारी १४ डिसेंबर रोजी श्रीदत्त जयंती साजरी होत आहे. धर्म ग्रंथानुसार या दिवशी भगवान दत्तात्रयचा जन्म झाला होता. श्रीदत्तात्रयांचे स्वरूप त्रिगुणात्मक त्रिमूर्ती असलेले ब्रह्मा-विष्णू-महेश अशा स्वरूपाचे आहे. सत्त्व, रज आणि तम हे त्रिगुण, तसेच या गुणांचे प्रतीक म्हणजे त्रिमूर्ती दत्त होत. निर्मिती-पालन-संहार हे त्यांचे कार्य होय. देव आणि मुनिवर त्यांचे ध्यान करतात. दत्ताची उपासना तीन प्रकारे करता येते. गायत्री मंत्र वा गुरुमंत्राचे स्मरण, श्री गुरुचरित्र ग्रंथाचे पारायण सेवेतून ही उपासना होते. दत्तात्रेय ही तीन शिरे असलेली देवता औदुंबर वृक्षारवाली यज्ञकुंडासमोर अथवा अग्नीसमोर बसलेली दिसते. गळ्यात रुद्राक्षमाळा, अंगावर भस्माचे पट्टे, समोर चार कुत्री, मागे गाय असा परिवार दिसून येतो., स्वरूप दिगंबर म्हणजे फक्त पितांबर नेसलेले असा अवस्थेत ध्यानस्थ बसलेले दिसतात. चार कुत्री हे चार वेद आणि शंकराचे भैरव मानले जातात. रुद्राक्ष, अंगावर भस्म यांवरून ते स्मशानात राहणाऱ्या शिवाचे ध्यान करत असल्याचे दिसते.**

## इच्छापूर्तीसाठी अशी करा श्रीदत्तात्रयांची पूजा

यंदा दत्त जयंती १४ डिसेंबर २०२४ रोजी, शनिवारी साजरी होणार आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी 'दत्त जयंती' उत्साहात साजरी केली जाते.
या दिवशी श्रीदत्ताची विशेष पूजा केली जाते. हिंदू धर्मात त्यांना देव मानले जाते. स्वधर्म आणि स्वसंस्कृती संकटग्रस्त असताना, त्यांची जोपासना व संरक्षण करण्याचे महत्त्वाचे कार्य दत्त संप्रदायाने केले. दत्त ही देवता अत्रि ऋषी व त्यांची पत्नी अनुसया यांचे पुत्र असून त्यांना दुर्वास व सोम नावाचे दोन भाऊ आहेत. सत्त्व, रज आणि तम ह्या त्रिगुणांचे प्रतीक म्हणजे 'त्रिमूर्ती दत्त गुरु' मानले जातात. दत्ताची उपासना करण्याचे तीन प्रकार सांगण्यात येतात. गुरुमंत्राचे अथवा गायत्री मंत्राचे स्मरण किंवा श्री गुरुचरित्र ग्रंथाचे पारायण करून ही उपासना होते.

दत्त जयंती पूजा: चौरंग मांडून त्यावर लाल कपडा टाकावा. त्यावर श्री दत्ताची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापित करावी. यानंतर श्री दत्ताचे आवाहन करावे. एक तांबा भरुन पाणी जवळ ठेवावे. उजव्या हातामध्ये एक फूल आणि थोड्या अक्षदा घेऊन या मंत्राचे उच्चारण करावे. 'ॐ अस्य श्री दत्तात्रेय स्तोत्र मंत्रस्य भगवान नारद ऋषिः अनुष्टुप छन्दः, श्री दत्त परमात्मा देवताः, श्री दत्त प्रीत्यर्थे जपे विनोयोगः।' त्यानंतर फुल आणि अक्षता अर्पण करुन या मंत्राचे उच्चारण करावे -

'जटाधरं पाण्डुरंगं शूलहस्तं कृपानिधिम। सर्व रोग हरं देव, दत्तात्रेयमहं भज।।'

श्री दत्ताची पूजा, धूप, दीप व आरती करावी. ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः या मंत्राने एक जप माळ करावी. या दिवशी भजन, किर्तन करावे. या दिवशी दत्त गुरुंना सुंठवड्याचा प्रसाद दाखवून भक्तांमध्ये वाटप करावा. दत्ताला पिवळे फुलं आणि पिवळ्या रंगाची मिठाई अर्पित करावी.

या दिवशी अवधूत गीता पाठ केल्याने पितृदोषापासून मुक्ती मिळते. दत्त जयंतीपूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. गुरुचरित्राचे पारायण सात दिवसांआधी वाचणे सुरु करुन, त्याची समाप्ती 'दत्त जयंतीच्या' दिवशी केली जाते.

श्री दत्तात्रेय मंत्रांचा नियमित जप केल्याने भक्तांना सर्व प्रकारच्या इच्छित भौतिक वस्तू आणि संपत्ती प्राप्त होते.

तसेच दत्त जयंतीपूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे.

गुरुचरित्राच्या पारायणाने जीवनातील अनेक संकटापासून मुक्ती होण्यासाठी मदत होते. या पारायणाने आपल्या कुटुंबावर, आपल्यावर दत्तप्रभुंचा आशीर्वाद कायम राहतो. तसेच आपल्या जीवनातील सर्व उद्दिष्टे पूर्ण करणे सोपे होते.

दत्तात्रेय मंत्र

* बीज मंत्र - ॐ द्रां।

* तांत्रोक्त दत्तात्रेय मंत्र- ॐ द्रांदत्तात्रेयाय नमः

* दत्त गायत्री मंत्र- ॐ दिगंबराय विद्महेयोगीश्रारय्धीमही तन्नो दतः प्रचोदयात

* दत्तात्रेय महामंत्र- दिगंबरा-दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा

* दक्षिणामूर्ति बीजम च रामा बीकेन संयुक्तम्।

द्रम इत्यक्षक्षाराम गनम बिंदूनाथाकलातमकम दत्तास्यादि मंत्रस्य दत्रेया स्यादिमाश्रवह तत्रैस्तृप्य सम्यक्त्वंबिन्दुनाद कलात्मिका येतत बीजम्मयापा रोक्तम्ब्रह्म-विष्णु- शिव नामकाम।

चिंता किंवा अज्ञात भीतीपासून मुक्त होण्यासाठी दत्तात्रेय मंत्र चमत्कारिकरित्या कार्य करतं.

अशुभ ग्रहांमुळे होणाऱ्या त्रासांपासून मुक्ती मिळवण्यासाठी श्री दत्तात्रेय मंत्राचा नियमित जप करावा.

सर्व प्रकारचे मानसिक त्रास किंवा अगदी कौटुंबिक त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी श्री दत्तात्रेय मंत्र खूप प्रभावी आहेत.

श्री दत्तात्रेय मंत्राचा दररोज जप केल्याने आध्यात्मिक प्रवृत्ती विकसित होते. आणि व्यक्तीच्या आत्म्याला सर्व प्रकारच्या कर्म बंधनांपासून मुक्ती मिळते.



भगवान श्री दत्तात्रेयांना तंत्राधिपती असेही म्हणतात, असे म्हणतात की जो कोणी दररोज भगवान दत्तात्रेयांचे स्मरण करतो, त्यांच्या श्री नारद पुराणात लिहिलेल्या त्यांच्या दिव्य स्तोत्राचे पठण करतो, त्या व्यक्तीचे जीवनातील सर्व संकटे दूर होण्यासोबतच मुक्तीही मिळते. पितृ दोष आणि सतत प्रगती करू लागते. भगवान दत्तात्रेयांच्या जयंतीपासून दररोज या स्तुतीचा पाठ केल्यास प्रत्येक मनोकामना पूर्ण होते.

## दत्तात्रय प्रभावी स्तोत्र

जटाधरं पाण्डुराङ्गं शूलहस्तं कृपानिधिम् ।
सर्वरोगहरं देवं दत्तात्रेयमहं भजे ।।

अस्य श्रीदत्तात्रेयस्तोत्रमन्त्रस्य भगवान् नारदऋषिः ।
अनुष्टुप् छन्दः । श्रीदत्तपरमात्मा देवता ।
श्रीदत्तप्रीत्यर्थे जपे विनियोगः ।।

जगदुत्पत्तिकर्त्रे च स्थितिसंहार हेतवे ।
भवपाशविमुक्ताय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। १।।

जराजन्मविनाशाय देहशुद्धिकराय च ।
दिगम्बरदयामूर्ते दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। २।।

कर्पूरकान्तिदेहाय ब्रह्ममूर्तिधराय च ।
वेदशास्त्रपरिज्ञाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। ३।।

र्हस्वदीर्घकृशस्थूल-नामगोत्र-विवर्जित ।
पञ्चभूतैकदीप्ताय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। ४।।

यज्ञभोक्ते च यज्ञाय यज्ञरूपधराय च ।
यज्ञप्रियाय सिद्धाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। ५।।

आदौ ब्रह्मा मध्य विष्णुरन्ते देवः सदाशिवः ।
मूर्तित्रयस्वरूपाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। ६।।

भोगालयाय भोगाय योगयोग्याय धा रिणे ।
जितेन्द्रियजितज्ञाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। ७।।

दिगम्बराय दिव्याय दिव्यरूपध्राय च ।
सदोदितपरब्रह्म दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। ८।।

जम्बुद्वीपमहाक्षेत्रमातापुरनिवासिने ।
जयमानसतां देव दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। ९।।

भिक्षाटनं गृहे ग्रामे पात्रं हेममयं करे ।
नानास्वादमयी भिक्षा दत्तात्रेय नमो ऽस्तुते ।। १०।।

ब्रह्मज्ञानमयी मुद्रा वस्त्रे चाकाशभूतले ।
प्रज्ञानघनबोधाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। ११।।

अवधूतसदानन्दपरब्रह्मस्वरूपिणे ।
विदेहदेहरूपाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। १२।।

सत्यंरूपसदाचारसत्यधर्मपरायण ।
सत्याश्रयपरोक्षाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। १३।।

शूलहस्तगदापाणे वनमालासुकन्धर ।
यज्ञसूत्रधरब्रह्मन् दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। १४।।

क्षराक्षरस्वरूपाय परात्परतराय च ।
दत्तमुक्तिपरस्तोत्र दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। १५।।

दत्त विद्याढ्यलक्ष्मीश दत्त स्वात्मस्वरूपिणे ।
गुणनिर्गुणरूपाय दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। १६।।

शत्रुनाशकरं स्तोत्रं ज्ञानविज्ञानदायकम् ।
सर्वपापं शमं याति दत्तात्रेय नमोऽस्तुते ।। १७।।

इदं स्तोत्रं महद्दिव्यं दत्तप्रत्यक्षकारकम् ।
दत्तात्रेयप्रसादाच्च नारदेन प्रकीर्तितम् ।। १८।।

।। इति श्रीनारदपुराणे नारदविरचितं
दत्तात्रेयस्तोत्रं सुसम्पूर्णम् ।।

।। श्री गुरुदेवदत्त ।।

## 'भ्रष्टाचार निर्मूलन' शब्द वापरण्यास सामाजिक संघटनांना परवानगी

### हायकोर्टाकडून धर्मादाय आयुक्तांचे परिपत्रक रद्द

मुंबई

**मानवी** हक्क, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन, भ्रष्टाचार निर्मूलन महासंघ यांसारखी नावे ट्रस्टच्या नावात नसावीत, असे मनाई करणारे धर्मादाय आयुक्तांचे परिपत्रक उच्च न्यायालयाने नुकतेच रद्द केले. असे शब्द वापरण्यापासून समाजसेवी संस्थांना रोखता येणार नाही,असे म्हणत 'नाम में क्या रखा है, काम देखना चाहिये,' अशी टिप्पणी उच्च न्यायालयाने यावेळी केली.

कोणतीही ट्रस्ट किंवा संघटना त्यांच्या नावात 'भ्रष्टाचार निर्मूलन महासंघ', 'भ्रष्टाचार विरोधी आंदोलन', 'भ्रष्टाचारमुक्त भारत', किंवा 'मानवी हक्क' यांसारखे शीर्षक वापरू शकत नाही, असे परिपत्रक जुलै २०१८ मध्ये धर्मादाय आयुक्तांनी जारी केले होते. या निर्णयाला मानवी हक्क संरक्षण जागृती या संस्थेचे विकास कुचेकर व अभिषेक हरिदास यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.न्यायमूर्ती महेश सोनक व न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी 'मानवी हक्क आणि भ्रष्टाचारविरोधात लढा, ही बाब सामान्यांसाठी आहे. त्यासाठी संघटना किंवा ट्रस्टची स्थापना केली जाऊ शकते. आम्ही तर असे म्हणतो,'नाम में क्या है? काम देखना चाहिये. अगर काम गलत हो तो सक्त कारवाई होनी चाहिए,' असे न्यायालयाने म्हटले.

## किंग चार्ल्स यांनी भारतीय वंशाच्या सदस्यांची सन्मानपदे रद्द केली

लंडन

**ब्रिटनचे** राजे किंग चार्ल्स यांनी मूळ भारतीय वंशाच्या दोन सदस्यांना दिलेली सन्मानपदे रद्द केली आहेत. रमिंदर सिंह रेंजर आणि अनिल कुमार भानोत अशी या सदस्यांची नावे आहेत. रमिंदर सिंह रेंजर हे हुजूर पक्षाचे नेते आहेत. ते हाऊस ऑफ लॉर्डसचे सदस्य आहेत. त्यांना कमांडर ऑफ द ब्रिटीश एम्पायर (सीबीई) हा सन्मान बहाल करण्यात आला होता. त्यांच्यावर सन्मान पदे बहाल करण्याच्या प्रक्रियेचा अवमान केल्याचा आरोप आहे. त्यामुळे त्यांचा सीबीई हा सन्मान किंग चार्ल्स यांनी काढून घेतला. आंतरधर्मिय सलोखा राखण्यामध्ये दिलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी अनिल कुमार भानोत यांना ऑफिसर ऑफ द सिव्हील डिव्हिजन ऑफ द मोस्ट एक्सलंट ओबीई हा सन्मान देण्यात आला होता. त्यांच्यावर आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. त्यांना दिलेला सन्मानही रद्द करण्यात आला.

## नाशिकला अवकाळी पावसाने झोडपले! द्राक्षाला मोठा फटका



नाशिक

**मागील** तीन दिवसांत शहरासह जिल्ह्याला जोरदार अवकाळी पावसाने झोडपले. गुरुवारी रात्रीपासून विविध भागात पावसाने हजेरी लावल्याने जनजीवन विस्कळीत झालेहोते. जिल्ह्यात द्राक्षांसह रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी द्राक्षबागा आडव्या झाल्या. शेतकऱ्यांची शेतातील पिके वाचवण्यासाठी धावपळ उडाली. या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, मुख्यमंत्र्यांनी तत्काळ नुकसानीची पाहणी करून भरपाई देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. काल नाशिक शहरातील नाशिकरोड, पंचवटी, सिडको, सातपूर भागात सायंकाळी जोरदार पाऊस झाला. ग्रामीण भागात अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील गहु, हरभरा, कांदा, मका आणि सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

लागवडीसाठी शेतकऱ्यांनी महागड्या दराने बियाणे खरेदी करून कांदा रोप टाकले आहे. या अवकाळी पावसाने कांदा रोप खराब होऊन नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिलापूर परिसरात काल मध्यरात्री अचानक अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली. त्यात फुलोरा अवस्थेतील द्राक्षबागांचे अतोनात नुकसान होण्याचा अंदाज द्राक्ष बागायतदारांनी व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्रातील ६ ग्रामपंचायतींना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार

नवी दिल्ली

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय पंचायत पुरस्कार वितरण कार्यक्रम ११ डिसेंबरला होणार आहे. दिल्लीतील विज्ञान भवनात हा कार्यक्रम होईल.महाराष्ट्रातील ६ पंचायत राज संस्थांना या कार्यक्रमांमध्ये पुरस्कार प्रदान केले जातील.या कार्यक्रमात पंचायत राजशी संबंधित विविध श्रेणीमध्ये पुरस्कार प्रदान होतील. भारत सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाच्यावतीने देशपातळीवरील ग्रामपंचायतींची या पुरस्कारांसाठी तपासणी झाली. यावर्षी साताऱ्यातील पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी देशातली सर्वोत्तम ग्रामपंचायत ठरली. नानाजी देशमुख सर्वोत्तम ग्रामपंचायत पुरस्कार मान्याचीवाडी ग्रामपंचायतीला जाहीर झाला. त्याचबरोबर ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पुरस्कारही या गावास जाहीर झाला. महाराष्ट्रातील नाशिक, सातारा, गोंदिया, भंडारा जिल्ह्यांमधील ६ पंचायत राज संस्थांना पुरस्कार मिळणार आहेत.

## आता 'बीएड' चा कालावधी पुन्हा एक वर्षाचा होणार!

पुणे

**राष्ट्रीय** शिक्षक शिक्षण परिषदेने बीएड म्हणजेच बॅचलर ऑफ एज्युकेशनच्या अभ्यासक्रमामध्ये काही बदल सुचवले होते.त्यानुसार आता बी.एड.चे स्वरूप, कालावधी आणि अभ्यासक्रम २०२६-२७ पासून बदलणार आहे. हा अभ्यासक्रम पुन्हा एक वर्षाचा होणार आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत हा बदल होत आहे. टीईटी अर्थात शिक्षक पात्रता चाचणीच्या नियम आणि निकषांमध्येही बदल केले जाणार आहेत. हे बदल २०२७ मध्ये चार वर्षांच्या एकात्मिक पदवी उमेदवारांच्या बॅचच्या आधी केले जातील. शैक्षणिक धोरणांतर्गत, पायाभूत, पूर्वतयारी, मध्यम आणि




माध्यमिक स्तर या चार भागांनुसार शिक्षक तयार केले जातील. पदवीपूर्व अभ्यासक्रमातील बदलांमुळे विविध बीएड कार्यक्रम पुन्हा सुरू केले जात आहेत. बीएड महाविद्यालयांसाठी नवीन बदलांची अधिसूचना लवकरच जारी केली जाणार आहे. यामध्ये चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. चार वर्षांचा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना एका वर्षात बी.एड.साठी प्रवेश घेता येईल.

तीन वर्षांच्या पदवीधर विद्यार्थ्यांना दोन वर्षातील बी. एड. साठी प्रवेश मिळेल.पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळणार आहे.पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळेल. चार वर्षांचे एकात्मिक बी. एड. आणि दोन वर्षांचे बी. एड. शिकणारे विद्यार्थी एम.एड.च्या पदवीसाठी प्रवेश घेऊ शकतील.

## समितीवर पूजा खेडकरचा आक्षेप औरंगाबाद खंडपीठात याचिका

औरंगाबाद

**प्रशिक्षणार्थी** सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्या याचिकेच्या अनुषंगाने मुख्य सचिव आणि अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. एस. जी. मेहरे आणि न्या. एस. जी. चपळगावकर यांनी दिला. खेडकर यांचे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे.

त्या समितीने खेडकर यांना सुनावणीची संधी न देता एकतर्फी अहवाल तयार करून ३ डिसेंबरला सुनावणी ठेवली होती, असा आक्षेप घेत खेडकर यांनी खंडपीठात याचिका दाखल केली. अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांचा नॉन क्रिमिलिअर संबंधितचा अहवाल रद्द करण्याची विनंती त्यांनी याचिकेद्वारे केली आहे. तर यासंबंधीची सुनावणी अहिल्यानगर आणि पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून काढून ती अन्य जिल्ह्यात वर्ग करण्याची विनंती करण्यात आली. यावर पुढील सुनावणी १७ डिसेंबर रोजी होणार आहे.

## गुहागरमध्ये टेम्पो ट्रॅव्हल्स झाडाला आदळली! १७ जखमी

गुहागर

**गाडीवरील** नियंत्रण सुटून रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडाला पर्यटकांना घेऊन जाणारी टेम्पो ट्रॅव्हल्स आदळली. त्यात चालकासह १७ जण जखमी झाले. ही घटना काल रात्री रत्नागिरीच्या गुहागरमध्ये घडली.

कल्याण - डोंबिवली येथील पोंक्षे परिवारातील १७ जण टेम्पो ट्रॅव्हल्समधून पर्यटनासाठी काल सकाळी डोंबिवलीतून निघाले होते. गुहागरला व्याडेश्वर दर्शन, समुद्राचा आनंद लुटून ही मंडळी संगमेश्वर तालुक्यातील पोंक्षे आंबव येथे जाणार होती. रात्री ही गाडी पूल ओलांडून घोणसरे सुतारवाडी बसथांब्यापर्यंत आली तेव्हा चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. परिणामी ही गाडी रस्त्याच्या डाव्या बाजूला एका झाडावर आदळली.या धडकेनंतर गाडी जागीच उलटली. ही घटना समजल्यानंतर घोणसरे



सुतारवाडीतील ग्रामस्थांनी गाडीचा मागील दरवाजा उघडून १५ प्रवाशांना बाहेर काढले. तातडीने खासगी वाहनांनी सर्वांना चिपळूणच्या खासगी रुग्णालयात दाखल केले.

## बॅलेटवर फेर निवडणुकीसाठी जानकरांची राजीनाम्याची तयारी

मुंबई

**पंधरा** दिवसांत बॅलेट पेपरवर पुन्हा मतदान घेणार असाल तरी मी आमदारकीचा राजीनामा द्यायला तयार आहे, असे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार उत्तमराव जानकर यांनी निवडणूक आयोगाला म्हटले दिली. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदारसंघातून जानकर १३ हजारच्या मताधिक्क्याने विजयी झाले आहेत. त्यांनी महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांचा पराभव केला. मात्र विजयी होऊनही जानकर समाधानी नाहीत. आपल्याला मिळणार असलेली एक लाख मते इव्हीएममध्ये छेडछाड करून अन्यत्र वळवण्यात आली, असा जानकर यांचा आरोप आहे.

## निवडणुकीच्या काळात विदर्भातील १६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

अकोला

**निवडणुकीच्या** ६० दिवसाच्या काळात विदर्भातील तब्बल १६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या करत आपले जीवन संपवले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्रासाठी विशेष पॅकेज देत शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी पावले टाकावीत अशी मागणी किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी केले आहे.



अजित नवले म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या ६० दिवसांच्या काळात विदर्भातील तब्बल १६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. उर्वरीत राज्यातदेखील अशा आत्महत्या वाढत आहेत. शेतीमालाचे भाव सातत्याने पाडण्याचे धोरण, वाढता उत्पादन खर्च व नैसर्गिक आपत्तीत होणारे शेतकऱ्यांचे नुकसान या प्रमुख कारणांमुळे शेतकऱ्यांच्या या आत्महत्या वाढत आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने शेतकरी आत्महत्यांची बाब लक्षात घेत महाराष्ट्रासाठी विशेष पॅकेज जाहीर करावे. तसेच सरकारने शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी पावले टाकावीत. शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करून शेतीमालाला रास्त दर देत, नैसर्गिक आपत्ती शेतकऱ्यांना दिलासा देणारी धोरणे राबवावीत.

देश विदेश

## अल्लू अर्जुनकडून मृत्युमुखी महिलेच्या नातेवाईकांना २५ लाख



■ हैदराबाद

४ डिसेंबर रोजी हैदराबादच्या संध्या थिएटरमध्ये 'पुष्पा-२' च्या स्क्रिनिंगदरम्यान चेंगराचेंगरीत रेवतीचा (३५) मृत्यू झाला तर त्यांचा मुलगा श्रीतेजा (९) बेशुद्ध झाला. या प्रकरणी अल्लू अर्जुन, त्याची सुरक्षा एजन्सी आणि थिएटरवर गुन्हा दाखल केला होता. या चेंगराचेंगरीत मृत्यू झालेल्या महिलेच्या नातेवाईकांना अल्लू अर्जुनने २५ लाख रुपये मदत देण्याचे जाहीर करून मृत रेवतीच्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत.

अल्लू अर्जुनने एक्सवर एक व्हिडिओ शेअर केला. त्यात तो म्हणाला की, संध्या थिएटरमध्ये घडलेल्या दुःखद घटनेने मला खूप दुःख झाले आहे. या कठीण काळात कुटुंबाप्रती माझी संवेदना आहे. मी त्यांना आश्वस्त करू इच्छितो की या दुःखात ते एकटे नाहीत. मी कुटुंबाला वैयक्तिक भेटेन. या कठीण काळात मी त्यांना सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. मी कुटुंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देऊ इच्छितो. याशिवाय जखमींवर योग्य उपचार करता यावेत यासाठी आम्ही वैद्यकीय खर्चाचे नियोजन करू.

## राम विवाहाच्या मिरवणुकीवर दगडफेकीत ३ गंभीर जखमी

■ पटना

बिहारमधील दरभंगा येथे काल बाजीतपूर येथील मशिदीजवळ राम विवाहाच्या मिरवणुकीवर दगडफेक झाली. यानंतर मोठा गदारोळ झाला होता. विवाहपंचमीनिमित्त तरौनी गावातून मिरवणूक काढली होती. या वेळी एका समुदायाच्या लोकांनी आधी मिरवणूक थांबवली आणि नंतर लाठीमार करायला सुरुवात केली. यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांवर दगडफेक सुरू केली . परिस्थिती इतकी बिकट झाली की, रस्त्यावर सर्वत्र फक्त दगडच दिसत होते. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहोचला आणि परिस्थिती नियंत्रणात आणली.

## चीनच्या मदतीने नेपाळमध्ये बीआरआय प्रकल्प

■ काठमांडू



नेपाळमधील पायाभूत आणि दळणवळणाच्या सुविधांसाठी चीनने नेपाळला मोठे कर्ज देण्याचा निर्णय घेतला आहे . त्यासाठी दोन्ही देशांमध्ये बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह फ्रेमवर्क बी आर आय करार झाला आहे. या कराराचा उद्देश ट्रान्स-हिमालयीन मल्टी-डायमेंशनल कनेक्टिव्हिटी नेटवर्क तयार करणे आहे. ज्याद्वारे नेपाळला व्यवसाय आणि कनेक्टिव्हिटीचे प्रादेशिक केंद्र बनवायचे आहे.

या योजनेत महामार्ग, रेल्वे आणि ऊर्जा नेटवर्क यासारख्या अनेक महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश आहे. नेपाळचा चीन आणि आशियातील इतर देशांशी संपर्क वाढवून आर्थिक विकासाला चालना देण्याचे वचन दिले आहे.

केपी ओली यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत झालेल्या भेटीत बी आर आयने नेपाळसाठी गेम चेंजर असल्याचे वर्णन केले. यामुळे नेपाळमध्ये विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, यावर त्यांनी भर दिला. उत्तम पायाभूत सुविधांमुळे व्यवसाय, पर्यटन, कृषी आणि जलविद्युत यासाठी नवीन मार्ग खुले होतील.

## सीरियात बंडखोरांनी तिसरे शहर ताब्यात घेतले

**राजधानी दमास्कसकडे कूच**

दमास्कस - सीरियातील बंडखोर गट हयात तहरीर अल शाम (एचटीएस) ने शनिवारी दक्षिणेकडील दारा शहरावर त्यांनी ताबा मिळवला. काही दिवसांमधील बंडखोरांनी कब्जा केलेले हे तिसरे शहर आहे. यानंतर बंडखोरांनी राजधानी दमास्कसकडे आगेकूच सुरू केली असल्यामुळे राष्ट्राध्यक्ष बशर-अल-असाद यांच्या सरकारवर संकट ओढावले आहे. दरम्यान,सीरियातील बिघडलेल्या परिस्थितीनंतर भारत सरकारने सर्व भारतीय नागरिकांसाठी रात्री उशिरा एक सूचना जारी केली असून पुढील सूचना मिळेपर्यंत त्यांनी सीरियाला जाणे पूर्णपणे टाळावे, असा सल्ला दिला आहे.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते दिल्लीत 'अष्टलक्ष्मी महोत्सवा'चे उद्घाटन

■ नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भारत मंडपम येथे 'अष्टलक्ष्मी महोत्सवा'चे उद्घाटन केले. हा कार्यक्रम दिल्लीतील प्रगती मैदानावर आयोजित केला आहे. ईशान्य क्षेत्र विकास मंत्रालयाने पहिल्यांदाच 'अष्टलक्ष्मी महोत्सव' आयोजित केला आहे. हा महोत्सव कालपासून सुरू झाला असून उद्या संपणार आहे. या कार्यक्रमात ईशान्येकडील हस्तकला, कला, संस्कृती आणि विविधतेचे व्यावसायिक मिश्रण दाखवले आहे. दिल्लीतील प्रगती मैदानावर आयोजित 'अष्टलक्ष्मी महोत्सवा'मध्ये ईशान्येकडील आठ राज्यांचा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक वारसा दाखवला आहे.

## महाराष्ट्रातील सर्व नेत्यांना बेळगाव जिल्ह्यामध्ये बंदी

**कर्नाटक सरकारचा आदेश**

■ बेळगाव

कर्नाटकातील बेळगाव शहरात महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीने ९ डिसेंबर रोजी महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, या मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील नेत्यांना बंदी घालण्याचा आदेश कर्नाटक सरकारने काढला आहे.

कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रातील नेत्यांनी बेळगाव जिल्ह्यात प्रवेश करू नये अन्यथा त्यांना महाराष्ट्राच्या सीमेवरच रोखले जाईल असा इशारा कर्नाटक सरकारकडून देण्यात आला आहे.तसेच या मेळाव्याला कर्नाटक सरकारने परवानगी दिली नसून मेळावा घेतल्यास आयोजकांवर कारवाई करण्यात येईल. शिवाय महाराष्ट्रातील कोणताही नेता बंदी झुगारून कर्नाटकात आल्यास त्यांना तडीपार केले जाणार असल्याची माहिती बेळगावचे जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी ही माहिती दिली आहे. मागील अनेक वर्षांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद धुमसत आहे. सीमा भागातील नागरिकांसाठी महाराष्ट्रात एकीकरण समितीचा लढा सुरू आहे.

## दक्षिण चीन समुद्रात अमेरिकेसह जपान, फिलिपाइन्सचे सैन्य तैनात

■ मनिला

दक्षिण चीन समुद्रात सध्या तणावाची स्थिती निर्माण झाली असून अमेरिका, जपान आणि फिलिपाइन्सने आपली विमाने आणि जहाजे पाठवली आहेत. संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावर हक्क सांगणाऱ्या चीनला शह देण्यासाठी या तीन देशांनी ही खेळी खेळली आहे. अमेरिका, जपान आणि फिलिपाइन्सचे चीनशी संबंध बिघडत चालले आहेत. यामुळे चीनच्या आक्रमक धोरणाला तोंड देण्यासाठी अमेरिका, जपान आणि फिलीपिन्स देशांनी दक्षिण चीन समुद्राच्या वादग्रस्त क्षेत्रात आपल्या लष्करी हालचाल वाढवली आहे.अमेरिकेने समुद्राच्या भागात, लष्करी विमाने, तसेच जपानने आणि फिलिपाइन्सच्या नौसेना जहाजे पाठवून समुद्रात खळबळ उडवली.

## ट्रम्प दाम्पत्यासोबत डिनरसाठी मोजावे लागणार २ दशलक्ष डॉलर

■ वॉशिंग्टन



अमेरिकेचे नियोजित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या पत्नी अमेरिकेच्या भावी फर्स्ट लेडी मेलेनिया ट्रम्प यांच्यासोबत शाही डिनरची संधी लाभावी अशी अनेकांची इच्छा असेल. पण यासाठी १ ते २ दशलक्ष अमेरिकन डॉलर मोजावे लागणार आहे. एवढा भरभक्कम पक्षनिधी देणाऱ्या धनिकांनाच ही सुवर्णसंधी मिळेल, असे वृत्त अमेरिकेतील एका अग्रगण्य दैनिकाने दिले आहे.

पुढील वर्षी १९ जानेवारी रोजी डोनाल्ड आणि मेलेनिया ट्रम्प यांचे हे शाही भोजन होणार आहे. डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्याच दिवशी म्हणजे २० रोजी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेणार आहेत. त्यामुळे आदल्या रात्री होणाऱ्या या डीनरला अनन्यसाधारण महत्व आहे.

## कण्हेरमध्ये १५ दिवसांत उसाच्या ३५ फडांना आग

■ माळशिरस

सध्या तालुक्यातील एक गाव वेगळ्याच दहशतीच्या सावटाखाली वावरताना दिसत आहे.तालुक्यातील कण्हेर नावाच्या गावात गेल्या काही दिवसांपासून दिवसाढवळ्या अचानक उसाचे फड पेटत आहेत. निवडणुकीचे मतदान झाल्यापासून आतापर्यंत एकपाठोपाठ एक असे जवळपास ३० ते ३५ उसाचे फड आगीत भस्मसात झाले आहेत.

पहिल्या उसाच्या फडाला आग लागल्यावर ग्रामस्थांनी याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला पण कोणतेही कारण उघडकीस आले नाही. विशेष म्हणजे या



सर्व उसाचे फड हे तोडणीला आलेले होते. काही ठिकाणी उसतोडणी सुरु होती. पहिल्यांदा ऊस पेटल्यानंतर ग्रामस्थांनी फडाच्या चारी बाजूंनी दिवस रात्र पहारा ठेवण्यास सुरुवात केली. मात्र पहारा असूनही अचानक उसाला आग लागून काही कळायच्या आत संपूर्ण उसाचा फड भस्मसात होत आहे.एकदा ऊस पेटल्यानंतर कितीही प्रयत्न केला,तरी तो विझत नाही. ऊस विझवण्याच्या काही शेतकरी जखमीदेखील झाले आहेत. याप्रकरणी पोलीस प्रशासनाने तातडीने शोध घेऊन याच गावातील उसाला आग कशी लागते, याचा शोध घेण्याच्या सूचना माळशिरसचे नवनिर्वाचित आमदार उत्तम जानकर यांनी प्रशासनाला दिले आहेत.

## बिजापूर येथे महिला अंगणवाडी कर्मचाऱ्याची नक्षल्यांकडून हत्या

■ छत्तीसगड

छत्तीसगडच्या बिजापूर येथे एका महिला अंगणवाडी कर्मचाऱ्याची नक्षल्यांनी हत्या केल्याची घटना घडली. सीआरपीएफ कॅम्पपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर ही घटना घडली. लक्ष्मी पद्म असे मृत महिलेचे नाव असून मुलासमोरच तिची नक्षलवाद्यांनी निर्घृण हत्या केली.

लक्ष्मी पद्म यांना यापूर्वी दोनदा धमकी देण्यात आली होती. ही महिला आपल्याबद्दलची माहिती पोलिसांना देत असल्याचा संशय नक्षलवाद्यांना होता. या संशयातून नक्षलवाद्यांनी लक्ष्मी पद्म यांची हत्या केली.

मॅडेड एरिया कमिटी नावाच्या नक्षलवाद्यांच्या गटाने या हत्येची जबाबदारी स्वीकारली आहे. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

## करवीर पंचायत कर्मचारी पतसंस्था अपहार प्रकरण अध्यक्ष, संचालकांसह ३४ जणांवर गुन्हा दाखल

■ कोल्हापूर

**१३ कोटी २८ लाख रुपयांच्या अपहार**

करवीर तालुका पंचायत समिती कर्मचारी पतसंस्थेमध्ये झालेल्या १३ कोटी २८ लाख ०१ हजार ८९९ रुपयांच्या अपहार प्रकरणी जिल्हा परिषदेतील निवृत्त कर्मचारी सुबराव रामचंद्र पवार यांनी तक्रार दाखल केली होती.

काल रात्री लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्यात अध्यक्ष अतुल कारंडे याच्यासह संचालक मंडळ व इतर अशा ३४ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला.

संस्थेचे सभासद सुबराव पवार यांच्यासह अन्य ठेवीदार पतसंस्थेत ठेवी काढण्यासाठी गेले असता त्यांच्या खात्यातील रक्कम त्यांना दिली नाही. त्यानंतर फिर्यादी व ठेवीदार यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. परंतु, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन ठेवी देण्यास टाळाटाळ केली. कुरुकलीतील हनुमान सहकारी दूध संस्थेचा या पतसंस्थेशी काहीही संबंध नसताना या संस्थेचे शुभम एकनाथ परीट यांच्याशी संगनमत करून संस्थेच्या चालू बँक खात्यावरून खोटी व बनावट कागदपत्रे तयार करून वेळोवेळी आर्थिक फायद्याकरिता रक्कम काढून त्या माध्यमातून स्थावर व जंगम मालमत्ता खरेदी केल्याचे उघड झाले.

## मी केवळ हिंदू मतांवर विजयी एकही मुस्लीम मत नाही



■ मुंबई

**नितेश राणेंचा दावा**

मुंबईत विधान भवनात नव्याने निवडून आलेल्या आमदारांच्या शपथविधी वेळी कणकवलीचे नवनिर्वाचित आमदार नितेश राणे यांनी तिसऱ्यांदा आमदारकीची शपथ घेतली. यावेळी ते म्हणाले की, माझ्या मतदारसंघातील जनतेच्या प्रेमामुळे मी तिसऱ्यांदा निवडून आलो आहे. हिंदुत्व आणि विकास या दोन मुद्यांवर मी निवडणूक लढवली. माझ्या मतदारसंघातील हिंदू समाजाने मला मोठ्या प्रमाणावर मतदान केले. मला मिळालेल्या ५८ हजार मतांपैकी एकही मत मुसलमानाचे नाही हे मी हक्काने सांगू शकतो. माझा मतदारसंघ हा हिंदुत्ववादी विचाराचा मतदारसंघ आहे. पुढील ३ वर्षे सत्ताधारी आमदार म्हणून मी विकासाची प्रक्रिया सुरू ठेवणार आहे.

ते पुढे म्हणाले की, जनतेला माहित आहे टीका करणारे कावळे निवडणुकीपुरते असतात, आम्ही शिवरायांचे मावळे आहोत. ३६५ दिवस २४ तास जनतेच्या सेवेसाठी हजर आहोत.

## पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी देशातील 'सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत'

■ कराड

**बुधवारी नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव**

पाटण तालुक्यातील ढेबेवाडी खोऱ्यात वसलेल्या मान्याचीवाडी ग्रामपंचायतीने आपल्या ग्रामविकासाची यशस्वी घोडदौड देशपातळीवर पोहोचवली आहे. ही ग्रामपंचायत देशातील 'सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत' ठरली आहे. या ग्रामपंचायतीने एकाचवेळी देशपातळीवरील दोन मानाचे पुरस्कार पटकावले आहेत. ही वार्ता गावात कळताच गावकऱ्यांनी एकमेकांना पेढे भरवून आपला आनंद व्यक्त केला.

ग्रामविकासामध्ये प्रभावी काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना भारत सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाच्यावतीने देशपातळीवर देण्यात येणाऱ्या नानाजी देशमुख सर्वोत्तम ग्रामपंचायतीचा पुरस्कार पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी ग्रामपंचायतीला जाहीर झाला आहे.खरे तर या छोट्याशा गावाला पुरस्कारांचे गाव म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण या गावाने आतापर्यंत ७८ विविध पुरस्कार मिळविले आहेत.या गावाचे ध्येयवादी, तरुण सरपंच रवींद्र माने यांनी गावकऱ्यांच्या एकीच्या आणि कष्टाच्या जोरावर हा बहुमान मिळविला आहे. राज्य शासनाच्यावतीने नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार आणि ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पंचायत पुरस्कारासाठी या ग्रामपंचायतीची शिफारस केंद्र सरकारकडे केली होती. त्यानुसार मान्याचीवाडी ग्रामपंचायतीला १ कोटी ५० लाखांचा सर्वोत्तम ग्रामपंचायतीचा पुरस्कार आणि १ कोटी रुपयांचा प्रथम क्रमांकाचा ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पुरस्कारही जाहीर करण्यात आला आहे.

सरपंच रवींद्र माने या पुरस्काराबद्दल म्हणाले की, गावातील सर्वच घटकांनी २४ वर्षांपासून गावामध्ये लोकसहभागाची चळवळ उभी केली. यामध्ये अनेक चढउतार पाहिले. कधी यश आले तर कधी अपयश आले.

## सिद्धिविनायक मंदिर परिसर विकासासाठी वास्तू विशारद सल्लागाराची निवड

मुंबई- प्रभादेवीतील श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या परिसराचा विकास आणि आसपासची सुधारणा करण्यासाठी तब्बल ४९३.९२ कोटी रुपयांची तरतूद केली. उपलब्ध निधीतून या परिसराचे सुशोभिकरण करण्याचा आराखडा बनवण्यासाठी महापालिकेच्या वतीने वास्तुशास्त्रज्ञाची निवड केली. या कामासाठी वास्तूशास्त्रीय सल्लागार सेवेसाठी इंजिनिअस स्टुडिओ प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची निवड करण्यात आली आहे. यासाठी सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाच्या आवश्यकतेनुसार बांधकाम आराखडा बनविणे, व त्यावर मान्यता प्राप्त करणे, महापालिकेतील विविध खात्यांकडून अभिप्राय प्राप्त करणे व आवश्यक त्या सबंधित प्राधिकरणाकडून प्रस्तावास ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे, खात्याच्या मान्यतेकरिता कल्पनात्मक नकाशे बनविणे आदी कामांचा समावेश आहे.

## खिशात मोबाईलचा स्फोट! शिक्षकाचा जागीच मृत्यू

■ गोंदिया

खिशात ठेवलेल्या मोबाईलचा अचानक स्फोट झाल्याने एका शिक्षकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गोंदिया जिल्ह्यात घडली. या स्फोटात शिक्षकाच्या शेजारी असलेली वृद्ध व्यक्तीदेखील जखमी झाली आहे. जखमी वृद्धावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



या स्फोटातील मृत शिक्षकाचे नाव सुरेश संग्रामे असे आहे तर नत्थु गायकवाड असे जखमी वृद्धाचे नाव आहे. मृत शिक्षक आणि जखमी वृद्ध दोघेही एकमेकांचे नातेवाईक आहेत. साकोला तालुक्यातील सिरेगावटोला येथील रहिवासी असलेले शिक्षक संग्रामे आणि गायकवाड हे नातेवाईकाकडे एका कार्यक्रमासाठी अर्जुनी मोरगावकडे निघाले होते. यावेळी संग्रामे यांनी मोबाईल खिशात ठेवला होता. नातेवाईकाकडे जात असताना संग्रामे यांच्या खिशातील मोबाईलचा अचानक स्फोट झाला. या स्फोटात गंभीर जखमी झाल्याने संग्रामे यांचा जागीच मृत्यू झाला. तर संग्रामे यांच्या शेजारी असलेले गायकवाड हे देखील गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## कृष्णा पाणी योजनेला गळती इचलकरंजीचा पाणीपुरवठा बंद



■ इचलकरंजी

इचलकरंजीचा पाणी प्रश्न हा सगळीकडेच चर्चेत आहे. पाईपलाईनची गळती तसेच विविध कारणांमुळे शहराला पाणीटंचाईचा प्रश्न खूपच भेडसावत आहे. अशातच आता मजरेवाडी येथून इचलकरंजी शहरास पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या कृष्णा नळ पाणीपुरवठा योजनेच्या जुनी पाण्याच्या दाबनलिकेस कुरुंदवाड शहरातील महाराणा प्रताप चौक, कुरुंदवाड हायस्कूल जवळ गळती लागली आहे. त्यामुळे बुधवारी सायंकाळपासूनच पाणीपुरवठा तातडीने बंद करण्यात आला आहे.

यामुळे इचलकरंजी शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होणार आहे. याठिकाणची गळती काढण्याचे काम महापालिकेच्यावतीने तातडीने हाती घेण्यात आलेले आहे. त्यामुळे शहराचा पाणीपुरवठा हा पुढेही खंडित राहणार आहे. गळती काढण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा साठा जपून वापरून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पालिका आयुक्त तथा प्रशासक सुषमा शिंदे यांनी केले आहे.

## बाणावलीतील जागेत हॉटेल, पार्किंगला संतप्त ग्रामस्थांचा जोरदार विरोध

■ मडगाव

दक्षिण गोवा जिल्ह्यातील सासष्टी तालुक्यातील बाणावली गावात समुद्र किनाऱ्याजवळ असलेली जागा पार्किंग आणि थ्री स्टार हॉटेलसाठी खासगी कंपनीला देण्यास ग्रामस्थांनी विरोध दर्शविला आहे. त्यासाठी काल गावात खास ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. रात्री उशिरापर्यंत ही ग्रामसभा सुरू होती. बाणावली समुद्र किनाऱ्यावर असलेली गोवा पर्यटन विकास महामंडळाची जागा हॉटेल आणि पार्किंग प्रकल्पासाठी एका खासगी कंपनीला दिली जाणार आहे, अशी बातमी पसरल्याने येथील ग्रामस्थांमध्ये चलबिचल निर्माण झाली होती. त्यामुळे काल खास ग्रामसभा बोलावण्यात आली होती.

पर्यटन खात्याकडून बाणावली पंचायतीला कुठलाही अधिकृत प्रस्ताव अजूनपर्यंत आलेला नाही, असा खुलासा पंचायतीतर्फे करण्यात आला. यावेळी बोलताना बाणावलीच्या उपसरपंच ग्लिडा फर्नांडिस यांनी सांगितले की, ही पार्किंग जागा पर्यटन खाते ६० वर्षांच्या भाडेपट्टीवर खासगी कंपनीला देणार.

## जोगेश्वरी साई सहकारी गृहनिर्माण संस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न

**झोपडीधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

■ मुंबई

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १४४ (ड) नुसार सदर (नियो.) जोगेश्वरी साई सहकारी गृहनिर्माण संस्थेची सर्वसाधारण सभा मंगळवार, ३ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता मांगल्य मंगल कार्यालय, हिंदू फ्रेंड सोसायटी, रोड नं. ३, जोगेश्वरी (पूर्व) येथे पार पडली. या सर्वसाधारण सभेला प्रारुप परिशिष्ट-२मधील सर्व झोपडीधारकांनी उपस्थिती दर्शवली होती. या सर्व झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सहाय्यक सहकारी अधिकारी महेश नलावडे यांनी झोपडपट्टी पुनर्विकासाबाबत संपूर्ण माहिती समजून सांगितली. या सभेमध्ये झोपडीधारकांच्या सहमतीनेच (बिनविरोध) संस्थेचे मुख्य प्रवर्तक पांडुरंग सावंत आणि इतर प्रवर्तक तसेच विकासक मलकानी रियल्टस (एआयएम ग्रुप) आणि वास्तू विशारद मे. डॅनियल ॲण्ड असोसिएट यांची निवड करण्यात आली. झोपडीधारकांनी पुनर्विकाससंबंधित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे विकासकानेदेखील दिलखुलासपणे दिलीत. आपण इमारतींचे बांधकाम कोणत्या स्वरुपात बांधणार आणि कोणत्या सुविधा देणार याची परिपूर्ण माहितीदेखील विकासकाने समजून सांगितली. या सभेला झोपडीधारकांनी चांगला प्रतिसाद दिला असल्याचे मुख्य प्रवर्तक पांडुरंग सावंत यांनी सांगितले.

## मालेगाव सहकारी बँकेतील मनी लाँड्रिंगप्रकरणी ईडीची छापेमारी! १३.५ कोटींची रोकड जप्त

■ नाशिक

मालेगाव येथील सहकारी बँकेतील कथित गैरव्यवहाराशी संबंधित मनी लाँड्रिंगच्या तपासासंदर्भात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) काल पुन्हा छापे टाकून १३.५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली. केंद्रीय तपास यंत्रणेने दिवसभरात अहमदाबाद आणि मुंबईत सात ठिकाणांवर छापे टाकून १३.५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली. या प्रकरणी ईडीने आगनी अक्रम मोहम्मद शफी आणि वसीम वलीमोहम्मद भेसानिया या दोघांना अटक केली आहे.


दरम्यान, नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील विविध व्यक्तींच्या बँक खात्यांचा गैरवापर करून १०० कोटी रुपयांहून अधिक रकमेचे व्यवहार केल्याप्रकरणी मालेगाव येथील व्यापारी सिराज अहमद हारून मेमन याच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात ईडीने गेल्या महिन्यातही महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये छापे टाकले होते.




चहा विक्रेते आणि छोट्या १० ते १२ व्यावसायिकांच्या नावावर उघडण्यात आलेल्या बँक खात्यातून गेल्या चार महिन्यात १९६ कोटी रुपयांच्या ठेवी रोखीने काढल्या. या ठेवी काढल्यानंतर ज्यांच्या नावावर खाती होती ते खातेदार सतर्क झाले आणि त्यांनी पोलिसांत तक्रार केली. मात्र, यामध्ये मनी लॉड्रिंग झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर ईडीने तपास सुरू केला. त्या दरम्यान बनावट खात्यांची पोलखोल झाली. या घोटाळ्यामध्ये बँकेतील एक कर्मचारी सहभागी असून त्याने एमडी नावाने बनावट खाते बँकेत काढल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी नोव्हेंबरमध्ये सैफ नावाच्य एका व्यक्तीला अटक केली होती. त्याने १२५ कोटी रुपयांचा हवाल केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. दरम्यान, महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, हरियाणा, ओडिशा आणि पश्चिम बंगाल या राज्यांतील सुमारे अडीच हजारांहून अधिक व्यवहार आणि सुमारे १७० बँक शाखा ईडीच्या चौकशीच्या रडारवर आहेत.

पश्चिम रेल्वे
ट्रॅक डिव्हायडर पुरविणे
वरिष्ठ विअभि (दक्षिण) एमएमसीटी आमंत्रित करीत आहेत निविदा सूचना क्र.: बीसीटी/२४-२५/२२४ दिनांक: ०२.१२.२०२४. काम आणि ठिकाण : चर्चगेट-विरार अनुभाग - वरि. विअभि (दक्षिण) एमएमसीटी अनुभागाअंतर्गत ट्रॅक डिव्हायडर/कुंपण पुरविणे. कामाचे अंदाजित मूल्य: ₹ १,३६,०९,१४८.७५/-. ईएमडी: ₹ २,१८,१००/-. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. ३१.१२.२०२४ रोजी, १५.०० वाजेपर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. ३१.१२.२०२४ रोजी १५.३० वा. अधिक तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी.
0809
आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly

# नवाकाळ शब्दकोडे-१०९७



**आडवे शब्द –**

२. कोणाच्या अंकित नसणे, एकछत्री अंमल ६. खाण्याच्या पानांची लहान आकारांची जात ९. नशिबाने लाभलेले ११. ख्याती १२. मद्य १३. झावळीच्या पातीतील काडी १४. छपाईचे स्थान १६. अमृत, मुलींचे एक नाव १९. गूढ, खोल २१. ओल्या कचऱ्यापासून केलेले खत २२. मापापेक्षा जास्त, अवांतर कमाई २४. पूर्वज २६. सजावट २८. रास २९. प्रौढी मारणारा ३०. तुफान ३२. आजार ३५. मिठी ३६. डोंगर ३७. टिंगल ३८. घोड्यांची निगा राखणारा सेवक ३९. त्रिफळा चूर्णातील आंबट घटक ४१. ढगांमुळे दाटून आलेला अंधार ४३. लाल रंगाचा गोड कंद ४५. टरफलासहित तांदूळ ४६. भस्म ४८. प्रतिज्ञा ४९. हत्ती ५१. डोंगर ५३. धागा ५५. प्राप्ती ५७. निकाल, शेवट ५८. सूट, डिस्काऊंट ५९. मागचे वर्ष ६०. चारित्र्यसंपन्न ६२. नवी पालवी, तारुण्याचा बहर ६३. बोलणे, संवाद ६५. मैत्रीचे संबंध ६६. गलबताचे कापड ६७. कमनीय बांधा ६८. किंचित लठ्ठ, बाळसेदार ७२. काटकी ७३. नुकतेच रांधलेले ७४. बारीक ताप ७५. घोसाळे ७६. फोडणीचे ताक ७७. इंद्रिय, गात्र ८०. रुई ८२. प्लॅटफॉर्म ८४. लग्नात वधूपक्षाने दिलेल्या भेटवस्तू ८६. देह ८७. रांग ८८. षड्रसांपैकी एक ९०. मोगऱ्याच्या फुलांचा प्रकार ९३. गाढ निद्रा ९४. मराठी अकरावा महिना ९५. पडदा ९७. मत्त स्त्री ९९. वाणीच्या चार अवस्थांपैकी पहिली १००. पाचपोच १०३. सुंठीचे पूर्वरूप १०४. भूकंप १०६. फुलांची टोपली १०७. त्वरित १०८. शिरोभूषणाचा प्रकार

**उभे शब्द –**


१. पाण्याचा प्रवाह २. डोळ्यांदेखत ३. मंगळ ४. अमली, धुंदी आणणारे ५. घाई ६. पृथ्वी ७. घरातली किरकोळ कामे करणारा नोकर ८. राजा ९. दुर्दशा १०. दंगलीत सार्वजनिक मालमत्तेचा विध्वंस १४. चांगले १५. पोळीचा कुरकुरीत प्रकार १७. वचक, दरारा १८. सतत भांडणारा २०. मिठाईवाला २२. सततची हालचाल, चुळबूळ २३. पावट्याहून मोठे व रंगीत दाणे असलेली भाजी २४. खराब २५. नवरदेव २६. खोटा आरोप २७. तलाव २८. गारगोटीचा दगड ३१. विजयादशमी ३३. मासेमारीचा हूक ३४. अवघड ३८. प्रामाणिक ४०. वस्त्र ४२. देवी ४४. छत ४७. जहाजावरील महत्त्वाचे कर्मचारी ५०. पाणी ५२. मदत, योगदान ५४. त्रासलेला ५६. अभिप्रेत नसलेला ५७. गवताची काडी ५८. फावला वेळ ५९. हलक्या आवाजात स्वतःशी गाणे ६१. लेखी करार ६२. भाग्य ६३. अरिष्ट ६४. ताकीद ६७. अजिंक्य ६९. बलाक पक्षी ७०. परिणामकारक औषध ७१. शोध ७२. भोपळा ७३. खिडकीची काच ७६. त्रास, भुणभुण ७८. पावसाचा देव ७९. पोह्यांचा टिकाऊ झणझणीत प्रकार, हा भेळ, मिसळ वगैरेत वापरतात ८१. अतिवृष्टीचा परिणाम ८३. चंद्र ८५. जलप्रवासाचे कामचलाऊ साधन ८६. ओशाळगत ८७. प्रवाह ८९. लहान मुलींची कर्णभूषणे ९१. धाक ९२. मंडई, हाट ९४. मत्स्य ९५. हत्तीला नियंत्रित करण्याचे साधन, अंकुश ९६. मोठा वाडा, गढी ९८. स्थूल ९९. टोपली १००. बैरागी १०१. विरक्त धार्मिक स्त्री १०२. तांबूल १०३. आवेश १०४. आच, उष्णता १०५. अफवा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०९६ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. सुवासिक ४. भास्कर ६. अघटित ९. धादांत ११. प्रमाद १२. मीटर १३. गतप्राण १४. गाकर १६. हर १७. गाज १८. निकड २०. हरीण २१. भेजा २२. प्रथा २३. पायस २५. दुजा २६. वचक २८. नरम ३०. गरम ३१. काकड आरती ३३. बुडखा ३५. साथ ३६. नजराणा ३९. नातलग ४१. रागी ४३. वाया ४४. राखण ४६. रवंथ ४८. तडफ ५०. रघुपती ५२. त्रागा ५५. वाटप ५६. बळ ५८. लवकर ६१. अंतर देणे ६३. तोड ६४. वाकस ६६. सह ६७. मळलेला ६९. अढळपद ७१. शक ७२. रचना ७४. कण ७५. कमोदिनी ७६. तकवा ७७. बारकावा ७९. नस ८१. यूप ८४. कुळव ८५. सुविचार ८८. कानिफनाथ ९१. बगळा ९२. तपकीर ९४. रवका ९६. चारू ९७. हस्त १००. इकडे १०१. और १०२. अपुरा १०३. बहुविध १०४. चुणूक १०५. फूट १०६. कसाटा १०७. शौक १०८. घाणेरी

**उभे शब्द :** १. सुमार २. वाद ३. कमीज ४. भारनियमन ५. रगड ६. अप्राप्य ७. घण ८. तगारी ९. धार १०. तनुजा ११. प्रहसन १५. कणव १७. गाथा १९. कस २०. हजार २१. भेकड २२. प्रमथनाथ २३. पार २४. चकणा २५. दुआब २७. चबुतरा २९. रसा ३०. गफलत ३१. कारागीर ३२. तीर्थयात्रा ३४. खाजण ३७. जरा ३८. फार ४०. गडवा ४२. चपळ ४५. खर्चिक ४७. वंचित ४९. फटकळ ५१. घुबड ५३. गाल ५४. संदेह ५७. नकळत ५९. वर्ण ६०. रसिक ६१. अंबर ६२. रसना ६३. तोलामोलाचा ६४. वाढ ६५. सपक ६७. मणका ६८. लेक ६९. अनीन ७०. दवाखाना ७१. शरयू ७३. चर्या ७४. करवत ७७. बाळ ७८. वासुकी ८०. सकाम ८२. पचका ८३. आंबट ८४. कुळाचार ८६. विरह ८७. रम्य ८९. फस्त करणे ९०. थर ९३. पळपुटा ९५. वर्तणूक ९८. स्तबक ९९. पवित्रा १०१. औट १०२. असा

---




# राशिभविष्य

**रविवार ०८ डिसेंबर २०२४ ते शनिवार १४ डिसेंबर २०२४**

**- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे.**

**या सप्ताहात हर्षल मेष राशीत वक्री होत आहे. गुरु वृषभ राशीत, रवि आणि बुध वृश्चिक राशीत, शुक्र मकर राशीत असणार आहेत. शनिचा मुक्काम कुंभेत आणि राहूचा मीनेत आहे. ८ डिसेंबरला भानुसप्तमी आहे. ११ डिसेंबरला मोक्षदा एकादशी, गीता जयंती आहे. १४ डिसेंबरला श्रीदत्तात्रेयजयंती आहे. चंद्राचे भ्रमण कुंभ, मीन, मेष आणि वृषभ राशीतून होत आहे.**

## मेष

**वादविवाद टाळा**

आठवड्याची सुरुवात भरभराटीची आणि आनंदाचे संकेत देणारी आहे. भागिदारीत केलेले व्यवहार अथवा भागिदारीतील व्यवसायातून लाभ होईल. घरगुती व्यवसाय सुरू करण्यास चांगला कालावधी आहे. मानसिक अस्वस्थता, निराशा दूर ठेवा. विचारपूर्वक धाडस करा. मित्रमंडळींशी वाद नकोत. बोलण्यामुळे त्रास होऊ शकतो. कौटुंबिक जबाबदारी घ्यावी लागेल. अंतर्गत शत्रू त्रास देतील. खूप भावनाशील असणे हिताचे नसते हे ओळखून वागा. खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. धार्मिक कार्यांवर खर्च होण्याची शक्यता आहे. मनासारख्या गोष्टी घडवून आणाल. संततीची काळजी वाटली तरी काही नवीन संधी त्यांना मिळतील. १२, १३ तारखेला नवीन खरेदी कराल. जोडीदार तसेच कुटुंबातील अन्य सदस्यांबरोबर वादविवाद टाळा. प्रवासातून मिळणारा आनंद मनाची मरगळ दूर करणारा ठरेल. धार्मिक स्थळांना भेटीचे योग आहेत.

शुभ दिनांक : १२, १३, १४.

## वृषभ

**नवीन संधीचा लाभ**

सप्ताहाच्या सुरुवातीलाच नवीन संधी मिळतील. नवीन ओळखी होतील. त्यामधून लाभ मिळेल. मात्र संयमाने वागा, आंधळा विश्वास ठेवू नका. भागिदारीतून लाभ होईल. कामाच्या बोजाने कुटुंबियांसाठी वेळ मिळणे अशक्यप्राय ठरेल. नीतिनियमांचे पालन करणे महत्त्वाचे राहील. मोह टाळा. भाग्य साथ देईल. मित्रमंडळींशी गैरसमजातून वाद होण्याची शक्यता आहे. सप्ताहाच्या अखेरीस खरेदी करण्यास अनुकूलता आहे. धार्मिक कार्यात मन रमेल. १२ तारीख मानसिक संभ्रम निर्माण करणारी राहील. मनाचा गोंधळ उडेल. अशा घटना घडल्या तरी मन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करा. ११ व १२ या दोन्ही तारखांना कोणतेही व्यवहार करताना विशेष काळजी घ्या. व्यवसायात त्रासदायक घटना घडण्याची शक्यता आहे. नोकरीनिमित्त प्रवास होईल.

शुभ दिनांक : ११, १२, १४.

## मिथुन

**कर्माला भाग्याची साथ**

सप्ताहाच्या सुरुवातीला कामे रेंगाळतील. मात्र काळजी करू नका. कालांतराने परिस्थिती बदलेल आणि कामे पूर्ण होतील. व्यावसायिक महत्त्वाकांक्षा वाढल्यामुळे जोमाने कामाला लागाल. मात्र वास्तव परिस्थिती आणि क्षमता ओळखून पावले टाका. अडथळे आले तरी घाबरून जाण्याचे कारण नाही. भाग्याची साथ आहे. ध्यानधारणा मानसिक बळ वाढवणारी ठरेल. सप्ताहाचा मध्य आर्थिक प्राप्तीचा. योग्य गुंतवणूक भविष्यात चांगला फायदा देईल. शत्रूवर मात करून आत्मसन्मान परत मिळवाल. आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे राहील. किरकोळ आजार बरेच दिवस रेंगाळण्याची शक्यता आहे. त्यामुळे हेळसांड न करता वेळीच उपचार करा. १४ व १५ तारखांना खर्चावर नियंत्रण ठेवा. चुका टाळा. कलाकारांना शुभ काळ. विद्यार्थ्यांनी आरोग्य सांभाळावे.

शुभ दिनांक : ११, १२, १३, १४.

## कर्क

**कष्टाचे चीज**

सप्ताहाची सुरुवात अडचणीची वाटेल. मात्र नंतर परिस्थितीत सुधारणा होईल. कामाचा उत्साह वाढेल. कामे पार पाडता येतील. बोलण्यावर आणि खर्चावर नियंत्रण ठेवा. कुटुंबातील सदस्यांबरोबर व्यवसाय असल्यास शुभफलदायी ठरेल. हाताखालील लोकांना सांभाळून घ्यावे लागेल. काहींना अडथळ्यांनंतर यश मिळेल. दडपण न घेता कामे केल्याने यश मिळेल. सप्ताहाच्या शेवटी कष्टाचे चीज झाल्याने आनंदी असाल. उत्तम नेतृत्व केल्यामुळे मानसन्मान आणि यश लाभेल. १३ आणि १४ तारीख यशाचा आनंद देणारी. खेळाडू, कलाकार यांना चिकाटी ठेवल्यास यश लाभेल. विद्यार्थ्यांनी आळस झटकून अभ्यासाला लागावे.

शुभ दिनांक : १०, १२, १३, १४..

## सिंह

**तब्येत सांभाळा**

हा सप्ताह तुमच्यासाठी कसोटीचा आहे. सगळ्यात आधी आरोग्याकडे लक्ष द्या. नोकरीव्यवसायानिमित्त प्रवास घडतील. त्यातून त्वरित लाभ होणार नसला तरी पुढील काळात होईल. घरापासून लांब राहिलात तरी जबाबदारी पार पाडावीच लागेल. हाताखालच्या लोकांवर आंधळा विश्वास ठेवू नका. व्यवसायात भागिदाराचे वर्चस्व राहील. बंडखोर वृत्ती वाढेल. नियंत्रण ठेवा. सप्ताहाच्या शेवटी अपेक्षित परिणाम दिसतील. तोपर्यंत संयम, चिकाटी ठेवणे गरजेचे राहील. चुकीच्या गोष्टींच्या आहारी जाऊ नका. नको तेवढे धाडस अंगलट येऊ शकते. अहंकार, अभिमान बाळगू नका. संयमाने राहा, संयमाने बोला. स्वतःची प्रतिष्ठा कमी होऊ देऊ नका. १२ व १३ तारीख सरकारी तसेच परदेशाशी संबंधित कामांसाठी अनुकूल. विद्यार्थ्यांनी सचोटीचा मार्ग ठेवावा; जेणेकरून नुकसान टळेल.

शुभ दिनांक : ११, १२, १४.

## कन्या

**संयम बाळगा**

राशीस्वामी पराक्रमस्थानी असला तरी शनिचे असहकार्य असल्याने संयम बाळगण्याला पर्याय नाही. जिद्द आणि चिकाटी ठेवावी लागेल. गुरुमहाराज थोडी मदत करणार आहेत. त्याचा लाभ घ्या. नवीन संधी सावधपणे स्वीकारा. चर्चेत वेळ वाया घालवू नका. परदेशवारीची शक्यता निर्माण होईल. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. मानसिक ताण घेऊ नका. जोडीदाराबरोबर गैरसमज टाळा. संततीच्या तब्येतीच्या तक्रारी राहतील. शेअर्स, विमा इ. मार्गाने अल्प लाभ होतील. आरोग्य सांभाळावे. पायाचे दुखणे होऊ शकते. १० व ११ तारखेला मन स्थिर ठेवून पुढे चला. अपेक्षित लाभ होतील. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे राहील.

शुभ दिनांक : १२, १३, १४.

## तूळ

**आरोग्यात सुधारणा**

सप्ताहाच्या सुरुवातीला मरगळ झटकून जोमाने कामाला लागा म्हणजे तब्येतीच्या तक्रारी कमी होतील. व्यायाम, ध्यानधारणा उपयुक्त ठरेल. आर्थिक समस्या फारशा जाणवणार नाहीत. सरकारी तसेच आरोग्य क्षेत्राशी संबंधित काम करणाऱ्यांना हा सप्ताह लाभदायक ठरेल. संशोधन क्षेत्राशी संबंधित शिक्षणासाठीही अनुकूलता राहील. नोकरदारांसाठी कामानिमित्त प्रवासाचे योग. हाताखालची मंडळी त्यांच्या मनमर्जीने वागतील. व्यवसायात स्थित्यंतरे येऊ शकतात. जोडीदाराच्या स्वभावातील आक्रमकपणा वाढू शकतो. अध्यात्माकडे कल असणाऱ्यांसाठी सप्ताह अनुकूल. धार्मिक स्थळांना भेट देण्याचा योग आहे. विद्यार्थ्यांनी घोकंपट्टी न करता विषय समजून घेऊन अभ्यास करावा.

शुभ दिनांक : ११, १२.

## वृश्चिक

**समाधानकारक कालावधी**

आर्थिक चिंता दूर होतील. उद्योगव्यवसायातून लाभ होईल. नोकरीत बदल करण्यास सध्या अनुकूलता नाही. आरोग्यासंबंधी तक्रारी दूर होतील. वैवाहिक जोडीदाराबरोबर आनंदात, खेळीमेळीच्या वातावरणात सप्ताह घालवता येईल. प्रेमविवाह करू इच्छिणाऱ्यांसाठी अनुकूल काळ. घरच्यांची संमती मिळवण्यात यश मिळेल. घरातील वडिलधाऱ्यांशी जुळवून घ्या. हाती घेतलेले काम तडीस न्याल. कामात उत्साह टिकून राहील. मानसिक समाधान लाभेल. आर्थिक बाबतीतही समाधानी राहाल. आध्यात्मिक वातावरणात रमाल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे. मित्रमंडळींच्या संगतीत वाहवत जाऊ नये. परदेशी शिक्षणासाठी जाण्यासाठी अनुकूल ग्रहस्थिती आहे.

शुभ दिनांक : ९, १०, १३, १४.

## धनु

**आर्थिक दिलासा**

आर्थिक दृष्टीकोनातून सप्ताह चांगला जाईल. प्रयत्नांची पराकाष्ठा करून यश मिळेल. मनात चुकीच्या विचारांना थारा देऊ नका. गरजेचे आहे तेवढेच बोला. मित्रमंडळींशी वाद घालू नका. नोकरी व्यवसायानिमित्त परदेशी जाण्याचे योग आहेत. प्रवासात कागदपत्रे सांभाळा. नोकरदारांना बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. खाण्यापिण्याची पथ्ये पाळावीत. अन्नातून संसर्ग होण्याची शक्यता आहे. ९, १० तारखेला घरात थांबावेसे वाटणार नाही. ज्येष्ठांनी आरोग्य सांभाळावे. परदेशाशी संबंधित व्यापार करणाऱ्यांना सप्ताह अनुकूल. आर्थिक लाभ होतील.

शुभ दिनांक : ११, १२, १४.

## मकर

**पथ्यपाणी सांभाळा**

घरातील वातावरण आनंदी राहील याकडे लक्ष द्या. विनाकारण वाद घालू नका. संवाद जपून करा. उद्योगव्यवसाय करणाऱ्यांनी आर्थिक गुंतवणूक करताना अवाजवी धाडस टाळावे. ११ व १२ तारखेला तब्येतीची काळजी घ्या. पथ्य सांभाळा. प्रवास करावा लागल्यास बाहेरील पाणी पिणे टाळा. मूत्रसंसर्गापासून जपा. जोडीदाराबरोबर वाद टाळा. धार्मिक कार्यक्रमात सहभागाचे योग. तीर्थाटनाची संधी लाभेल. सरकारी क्षेत्रात असणाऱ्यांनी नियमांचे पालन करावे. नवीन नोकरी मिळण्याचे योग आहेत, प्रयत्न करा. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे. परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांनी कागदपत्रांची पूर्तता नेटकेपणाने करावी.

शुभ दिनांक : ११, १३, १४.

## कुंभ

**नियम पाळा**

लग्नस्थानातील शनि व दशमातील रवि-बुध केंद्रयोगाच्या पार्श्वभूमीवर नियमपालन महत्त्वाचे राहील. नियम पाळलेत तर यश पदरात पडणारच. सरकारी क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी चांगला सप्ताह. वरिष्ठांची मर्जी राहील. शत्रूंवर मात कराल. मानसन्मान लाभेल. स्पष्ट बोलण्याने नुकसान होऊ शकते. अतिआत्मविश्वास, अहंपणा टाळा. घरी पाहुणेमंडळींचे आगमन होईल. संततीची प्रगती होईल. त्यांच्या नोकरीचा प्रश्न सुटेल. आईच्या आरोग्याची काळजी घ्या. स्वतःचे आरोग्य जपा. उष्णतेचे विकार त्रास देण्याची शक्यता आहे. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. व्यवसायात प्रगती होईल. जोडीदाराची मदत मिळेल. त्याच्या सल्ल्याचा फायदा होईल. घरातील वडिलधाऱ्यांचा सन्मान जपा.

शुभ दिनांक : ११, १२, १३.

## मीन

**उत्साहवर्धक सप्ताह**

लग्नातील राहू, पंचमातील मंगळ, भाग्यातील रवि-बुध यांचा नवपंचम योग तसेच गुरु-शुक्र नवपंचम योग. यामुळे सप्ताह उत्साहवर्धक राहील. नवीन संकल्पना अमलात आणण्याचा प्रयत्न कराल. उद्योगव्यवसायात नवीन संधी येतील. परंपरागत व्यवसायात फायदा होईल. जोडीदाराच्या आरोग्यासंबंधी तक्रारी दूर होतील. त्याच्याशी सुसंवाद साधता येईल. घरात धार्मिक कार्याचे आयोजन करण्यास अनुकूलता. संततीसाठी प्रगतीचा मार्ग खुला होईल. शिक्षणातील अडथळे दूर होतील. व्यवसायातील, नोकरीतील कामानिमित्त प्रवासाचे योग. नवीन नोकरीची संधी मिळेल. अचानक धनप्राप्तीची शक्यता. मित्रमंडळींबरोबर मौजमजा करता येईल. चैनीच्या वस्तूंची खरेदी होऊ शकते. प्रकृती चांगली राहील.

शुभ दिनांक : ९, १०, १३, १४. ✱✱✱

नवाकाळ
• पुणे । रविवार ८ डिसेंबर, २०२४ • पान -८

## मध्य रेल्वेच्या मुरव्य व हार्बर मार्गावर आज मेगाब्लॉक!

■ मुंबई

**उपनगरीय** रेल्वे मार्गावर रुळांची दुरुस्ती, सिग्नल यंत्रणेची तांत्रिक कामे पूर्ण करण्यासाठी उद्या रविवार ८ डिसेंबर रोजी मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गावर मेगाब्लॉक घेतला जाणार आहे.



मध्य रेल्वेच्या माटुंगा-मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्गावर रविवारी सकाळी ११.३० ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत हा ब्लॉक असेल. ब्लॉक कालावधीत सीएसएमटीवरून सुटणाऱ्या आणि येणाऱ्या अप आणि डाऊन जलद लोकल माटुंगा-मुलुंड दरम्यान धीम्या मार्गावर वळवण्यात येणार आहेत. तसेच या लोकल १५ मिनिटे उशिराने धावतील. त्याचप्रमाणे हार्बर मार्गावर सीएसएमटी ते चुनाभट्टी/वांद्रे दरम्यान सकाळी ११.१० ते सायंकाळी ४.४० वाजेपर्यंत ब्लॉक असेल. या ब्लॉक कालावधीत सीएसएमटी ते वाशी/बेलापूर/पनवेलसाठी सुटणाऱ्या अप आणि डाऊन लोकल ब्लॉक कालावधीत रद्द करण्यात येणार आहेत. तर सीएसएमटी ते वांद्रे/गोरेगावसाठी अप आणि डाऊन मार्गावरील लोकल सेवाही रद्द करण्यात येणार आहे. ब्लॉक कालावधीत पनवेल - कुर्ला- पनवेल दरम्यान विशेष लोकल सेवा चालवण्यात येणार आहेत. हार्बर मार्गावरील प्रवाशांना सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुख्य मार्गावर आणि पश्चिम मार्गावर स्थानकांवरून प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

## थोडक्यात...

### साताऱ्यात २३ डिसेंबरपासून दूध बंद आंदोलन

**सातारा -** दूध उत्पादकांच्या मागण्या मान्य कराव्यात. अन्यथा राष्ट्रीय किसान दिनी येत्या २३ डिसेंबरपासून सातारा जिल्ह्यात बेमुदत दूध बंद आंदोलन केले जाईल, असा इशारा इशारा दूध उत्पादकांच्या बैठकीत देण्यात आला. त्याबाबतचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. यावेळी सातारा जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यांतील सर्व प्रकारची दूध वाहतूक बंद करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे कराड उत्तरचे तालुकाध्यक्ष प्रमोदसिंह जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली दूध दराबाबत बैठक झाली. बैठकीनंतर शेतकरी, दूध संकलकांसह उपस्थितांनी तहसीलदारांना निवेदन दिले. दुधाला उसाप्रमाणे ८०-२० नुसार एफआरपी कायदा लागू करावा, अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्राने दुधाचा ब्रँड विकसित करावा, गायीच्या दुधाला ४०, तर म्हशीच्या दुधाला ७० रुपये प्रति लीटर दर द्यावा आदी मागण्यांचा या निवेदनात समावेश आहे.

### धुळ्यात ईव्हीएम विरोधात ठाकरे गटाचा मोर्चा

**धुळे -** धुळ्यात ईव्हीएम विरोधामध्ये ठाकरे गटाच्या वतीने मशाल मोर्चाचे आयोजन केले आहे. ९ डिसेंबर सोमवार रोजी या मशाल मोर्चाची सुरुवात धुळे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून होणार आहे, त्यानंतर धुळे शहरातील महात्मा गांधी पुतळाजवळ सांगता होणार आहे. मशाल मोर्चा सोबतच ईव्हीएम मशीनची अंत्ययात्रा देखील काढली जाणार आहे. या संदर्भात ठाकरे गटाचे पदाधिकारी व माजी आमदार अनिल गोटे यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

### बांगलादेशात आणखी एक हिंदू मंदिर पेटवले

**ढाका -** बांगलादेशात आणखी एका हिंदू मंदिराला आग लावण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी इस्कॉनचे पुजारी चिन्मय कृष्ण दास यांना अटक करण्यात आली होती. इस्कॉनच्या नमहट्टा मंदिरावर शनिवारी पहाटे हल्ला करण्यात आला. इस्कॉन कोलकाता उपाध्यक्ष राधारमण दास यांनी आज सोशल एक्सवर पोस्ट करून याची माहिती दिली.

या मंदिराचा फोटो शेअर करत राधारमण दास यांनी सांगितले की, बांगलादेशमध्ये आणखी एक इस्कॉन नमहट्टा केंद्र जाळण्यात आले. मंदिरातील सर्व साहित्य जळून खाक झाले. हे मंदिर ढाका जिल्ह्यातील धौर गावात आहे. आज पहाटे २ ते ३ वाजताच्या दरम्यान मंदिराला समाजकंटकांनी आग लावली. तुराग पोलिस स्टेशन हद्दीत येते. पेट्रोल किंवा ऑक्टेनचा वापर करून मंदिरामागील टिनचे छप्पर उचलून आग लावली.

### सॅम पित्रोदा यांचा मोबाईल लॅपटॉप हॅक

**वॉशिंग्टन -** अमेरिकास्थित इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांचा मोबाईल व लॅपटॉप हॅक करण्यात आला आहे. सॅम पित्रोदा यांनी प्रसारमाध्यमांना ईमेल पाठवून ही माहिती दिली आहे. या ईमेलमध्ये त्यांनी म्हटले आहे की, गेल्या काही आठवड्यांपासून माझा लॅपटॉप व स्मार्टफोन सर्व्हर वारंवार हॅक झाले. हॅकरनी मला क्रिप्टोकरन्सीमध्ये हजारो डॉलर्सची मागणी केली असून न दिल्यास बदनामी करण्याची धमकी दिली आहे. माझ्या संबधित लोकांमध्ये माझी बदनामी केली जाईल अशी धमकी दिल्यामुळे माझ्या नावाने आलेल्या कोणत्याही अज्ञात लिंकवर क्लिक करु नये. माझ्या संदर्भात आलेले मेसेजही ओपन करु नका. माझ्याशी संबंधीत लिंकवर क्लिक करु नका.

## महाराष्ट्राला जागतिक बँकेकडून १,५९४ कोटींचे कर्ज




■ वॉशिंग्टन

**महाराष्ट्राला** विशेषतः त्यातील मागास जिल्ह्यांच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी जागतिक बँकेने १८ कोटी डॉलरहून अधिक (भारतीय चलनात १५९४ कोटी रुपये) रकमेचे कर्ज मंजूर केले आहे. या जिल्ह्यांमधील नागरिकांचा कौशल्य विकास, लोकहिताची धोरणे यांना बळकटी देण्यासाठी या निधीचा उपयोग होणार असल्याचे जागतिक बँकेने म्हटले आहे. यासंदर्भात जागतिक बँकेने एका निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा विकासासाठी आवश्यक असलेली माहिती तसेच रोजगार निर्मितीसाठी सुरू असलेले प्रयत्न यासाठी हा निधी वापरण्यात येणार आहे.

विविध जिल्ह्यांत पर्यटन क्षेत्रातील ई-सरकारी सेवांमध्ये सुधारणा करून त्यात खासगी क्षेत्राचा सहभाग वाढविणे यासारखी पावले महाराष्ट्र सरकार जागतिक बँकेने मंजूर केलेल्या कर्जाच्या रकमेतून करू शकणार आहे. जागतिक बँकेचे भारतासाठीचे संचालक ऑगस्टे तानो कौआमे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात जिल्हा स्तरावर उत्तम संस्थात्मक बांधणी करून, व्यवस्थित नियोजनाद्वारे जनतेला अधिक उत्तम सेवा देता येईल. विशेषतः पिछाडीवर असलेल्या जिल्ह्यांमध्ये या प्रकारचे काम होणे आवश्यक आहे. त्यासाठी हे कर्ज उपलब्ध करून दिले आहे. महाराष्ट्राचा विकास साधताना उत्तम समन्वय, विश्लेषण व दूरदृष्टी आवश्यक असून त्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना या निधीमुळे बळ मिळेल.

## धनिकांना सूट, गरिबांची लूट जीएसटीवाढीवर राहुल गांधींची टीका

■ नवी दिल्ली

**सिगारेट** आणि शीतपेयांवरील जीएसटी वाढविण्याच्या मंत्रिगटाच्या शिफारशीवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. जीएसटीचा करटप्पा वाढविण्याचा केंद्र सरकारचा हा डाव आहे. धनिकांना सूट आणि गरिबांची लूट, असे या सरकारचे धोरण आहे, अशा शब्दांत राहुल गांधी यांनी एक्स पोस्ट करून सरकारवर निशाणा साधला. एकीकडे कॉर्पोरेट कराच्या तुलनेत आयकरात झपाट्याने वाढ केली जात आहे. दुसरीकडे जीएसटीमध्ये वाढ करून सरकार जास्त महसूल मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे, असे राहुल गांधी म्हणाले.




मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी आज रस्त्यांवरील सर्व राजकीय पक्षांचे झेंडे आणि पोस्टर्स काढण्यास सुरुवात केली. (छाया-दीपक साळवी)

## मधुकर पिचड यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

■ नाशिक

**भाजपाचे** ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांच्यावर त्यांच्या मूळ गावी राजूर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे पार्थिव अकोले एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ती महाविद्यालयातील प्रांगणात नागरिकांना अंत्यदर्शन घेण्यासाठी ठेवले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दिलीप वळसे-पाटील, भारती पवार आणि पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने नागरिकांनी पिचड यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. मधुकर पिचड यांचे काल वयाच्या ८४ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांना पक्षाघाताचा झटका आला होता. गेल्या दीड महिन्यांपासून त्यांच्यावर नाशिकमधील रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांचा काल मृत्यू झाला.

## परदेशातील मागणी घटल्याने भारतीय हिरे उद्योगापुढे आव्हान!



■ नवी दिल्ली

**भारतातील** हिरे उद्योग गेल्या तीन वर्षांपासून परदेशातील मागणी घटल्याने मोठ्या आव्हानांना तोंड देत आहे. मागणीअभावी आणि रशियावरील 'जी- ७' राष्ट्रांच्या निर्बंधांमुळे भारतीय हिरे क्षेत्र प्रचंड मंदीचा सामना करत आहे, अशी माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी संसदेत दिली.

राज्यसभेतील एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी ही माहिती दिली. गोयल पुढे म्हणाले की, देशातील हिरे क्षेत्र गेल्या तीन वर्षांपासून प्रचंड मंदीचा सामना करत आहे, ही

### केंद्रीय मंत्री गोयल यांची संसदेत माहिती

वस्तुस्थिती आहे. प्रामुख्याने निर्यात होणाऱ्या देशांमधील मागणी कमी झाल्यामुळे व रशियन मूळच्या हिऱ्यांवरील 'जी-७' राष्ट्रांच्या निर्बंधामुळे पुरवठ्याची समस्या निर्माण झाली. हिरे क्षेत्र गेल्या ३ वर्षांपासून आव्हानांना तोंड देत आहे. हिऱ्यांची निर्यात २०२१-२२ मधील २५.४८ अब्ज डॉलरवरून २०२३-२४ या आर्थिक वर्षात १८.३७ अब्ज डॉलर इतकी झाली. गेल्या आर्थिक वर्षात आयात देखील २३ अब्ज डॉलर इतकी कमी झाली. ही आयात २०२१-२२ मध्ये २८.८६ अब्ज डॉलर होती. नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्चच्या ऑक्टोबर २०२० च्या रत्न आणि दागिन्यांच्या अभ्यासानुसार, हिरे उद्योगात १८,०३६ कंपन्या व ८,१९,९२६ कर्मचारी आहेत.

## रामलल्लाच्या मंदिरासाठी १० फूट सोन्याचा कळस

■ अयोध्या

**अयोध्येतील** रामलल्लाच्या मंदिराचा दहा फुटाचा कळस हा सोन्याने मढवला जाणार आहे. राम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी ही माहिती दिली आहे. राम मंदिर समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी काल राम मंदिराच्या कामाचा आढावा घेतला. त्यानंतर ते म्हणाले की, राम मंदिरचे काम पूर्ण करण्याला प्राध्यान्य दिले जाणार असून, १५ मार्चपर्यंत हे काम पूर्ण होईल. त्याचबरोबर सप्त मंदिरांचे सर्व कामही पूर्ण केले जाणार आहे. मार्चपर्यंत तीन चतुर्थांश काम पूर्ण होईल. सध्या किरकोळ काम शिल्लक राहिले आहे. ते पुढे म्हणाले की, मंदिराच्या खालच्या बाजूला असलेले ५०० फूट लांबीच्या बांधकामाचे आर्टवर्क पूर्ण झाले आहे.

## विधानसभेच्या पायऱ्यांवर फडणवीस-आदित्य भेट

■ मुंबई

**विधानसभेचे** तीन दिवसांचे विशेष अधिवेशन आजपासून सुरू झाले आहे. या विशेष अधिवेशनासाठी सकाळपासूनच विधानसभेच्या आवारामध्ये आमदारांची लगबग दिसून आली. सकाळी दहा वाजल्यापासून नवनिर्वाचित सदस्य विधानसभेत दाखल होऊ लागले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपआपल्या पक्षांच्या आमदारांसोबत विधानसभेत दाखल झाले. त्याचवेळी विधानसभेच्या पायऱ्यांवरच अचानक उद्धव ठाकरेंचे पुत्र



तसेच वरळी विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार आदित्य ठाकरे आणि मुख्यमंत्री फडणवीस समोरासमोर आले. या भेटीचा व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला.

अधिवेशनासाठी वरळीचे नवनिर्वाचित आमदार आदित्य ठाकरे विधानसभेच्या पायऱ्यांवर पोहोचले तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तिथेच उभे होते. आदित्य ठाकरेंनी त्यांना पाहताच हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. मुख्यमंत्र्यांनीही हसत हसत हात पुढे केला, दोघांनी एकमेकांशी हस्तांदोलन केले. आदित्य ठाकरेंनी फडणवीसांचे मुख्यमंत्री झाल्याबद्दल अभिनंदन केले, तर फडणवीसांनी आदित्य ठाकरेंना निवडणूक जिंकल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

## राज ठाकरे फडणवीसांचे बाहुले खासदार संजय राऊत यांची टीका

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिका निवडणुकीत राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलेल्या वक्तव्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी खरमरीत टीका केली. राज ठाकरे हे फडणवीस यांच्या हातचे बाहुले आहेत, अशा शब्दांत राऊत यांनी हल्ला चढवला.

फडणवीस राज ठाकरे यांचा आपल्या मर्जीनुसार कसाही वापर करतात. फडणवीस सांगतील तसेच राज ठाकरे बोलतात आणि तशाच भूमिका घेतात, अशी बोचरी टीका राऊत यांनी केली. अजित पवार यांची १ हजार कोटी रुपयांची जप्त केलेली मालमत्ता न्यायालयाने मुक्त केल्याबद्दलही राऊत



यांनी बोचरी टीका केली. अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेताच न्यायालयाने त्यांची जप्त केलेली एक हजार कोटींची मालमत्ता मुक्त केली त्याबद्दल मी अजित पवार, सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांचे अभिनंदन करतो.

## असा निकाल कसा असू शकतो? आकडेवारी देत शरद पवारांची टीका

■ कोल्हापूर

**एकीकडे** महायुती सरकार स्थापन झाले आहे, पण अजूनही विरोधकांकडून मतदान प्रक्रियेवर संशय व्यक्त केला जात आहे. आज शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आकडेवारी सादर करत असा निकाल कसा असू शकतो, असा संशय व्यक्त केला आहे. अजित पवार गटाला कमी मतदान असूनही जास्त उमेदवार जिंकले आहेत. तिथे पवार गटाला जास्त मतदान आहे, पण दहाच उमेदवार निवडून आले आहे, हे आकडे आश्चर्यकारक आहे.

शरद पवार कोल्हापूरच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेना शिंदे गट, पवार गट आणि आपल्या पक्षाला किती मते मिळाली, याची आकडेवारीच वाचून दाखवली.शरद पवार म्हणाले की, आज महाराष्ट्रामध्ये आम्ही पाहत आहोत, एक उत्साहाचे वातावरण असते. मला महाराष्ट्रात असे वातावरण दिसत नाही. मतांची आकडेवारी बघितली तर आश्चर्य वाटत आहे. काँग्रेसला महाराष्ट्रात ८० लाख मते असून, त्यांचे १५ उमेदवार विजयी झालेत.

## ईव्हीएमविरोधात सुप्रीम कोर्टात जाणार

■ पुणे

**विधानसभेचा** निकाल हा अनपेक्षित होता. त्यामुळे कायदेशीर लढाई लढणार आहोत. लोकांची मागणी असून, त्या मागणीचा आम्ही आदर करू. आम्ही ईव्हीएमविरोधात

### सुप्रिया सुळेंचे वक्तव्य

सर्वोच्च न्यायालयात नक्कीच याबद्दल दाद मागू. आम्ही याबाबत अनेक लोकांचे मार्गदर्शन घेत होतो. लोकांच्या मनात अस्वस्थता आहे. त्यांचे म्हणणे ऐकणे हे आमचे कर्तव्य आहे, असे राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. सुप्रिया सुळे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारवर टीका केली.

मारकडवाडीमध्ये काही जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. यावर त्या म्हणाल्या की, हे सर्व लोकशाही विरोधात आहे. गावामध्ये मॉक ड्रील होत असेल तर तो गुन्हा कसा होऊ शकतो? ही तर संविधानाच्या चौकटीत बसणारी प्रक्रिया आहे. सत्तास्थापनेनंतरही अद्याप खातेवाटप झालेले नाही. यावर बोलताना त्या म्हणाल्या की, आधी भाजपाची पद्धत असायची की, पटकन या आणि सरकार स्थापन करा. पण मलाही आता आश्चर्य वाटले की, अद्याप कोणतीही खातेवाटपाची चर्चा नाही. एवढे बहुमत मिळूनही जर भाजपाला एवढा वेळ लागत असेल तर यामागे नेमके कारण काय? हे त्यांनाच माहिती.

## पुन्हा विधानसभा निवडणूक होऊ द्या राम शिंदेंचे रोहित पवारांना आव्हान

■ मुंबई

**मी विधान** परिषदेच्या आमदारकीचा राजीनामा देतो, तुम्ही विधानसभेच्या आमदारकीचा राजीनामा द्या आणि पुन्हा विधानसभेची निवडणूक होऊ द्या, अशा शब्दांत भाजपाचे राम शिंदे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विजयी उमेदवार रोहित पवार यांना आव्हान दिले. अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात रोहित पवार यांनी राम शिंदे यांचा निसटता पराभव केला. ही लढत अत्यंत चुरशीची झाली. राम शिंदे यांचा या निवडणुकीत निसटता पराभव झाला. हा पराभव शिंदे यांच्या जिव्हारी लागला आहे. बारामतीच्या राजकारणाचे आपण बळी ठरलो, असे म्हणत काही दिवसांपूर्वी थेट अजित पवार यांच्यावर आरोप केला होता. शिंदे यांनी पैसे भरून कर्जत - जामखेडच्या १४ मतदान केंद्रांमधील ईव्हीएमच्या तपासणीचीही मागणी केली आहे. आता त्यांनी रोहित पवार यांना आव्हान दिल्याने कर्जत-जामखेड मतदारसंघ पुन्हा चर्चेत आला आहे.

## पुण्यात बांगलादेशातील हिंदूंच्या समर्थनार्थ ठाकरे गटाचे आंदोलन

### केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी

■ पुणे

**बांगलादेशातील** इस्कॉन या मानवतावादी, अध्यात्मिक संघटनेच्या सदस्यांवर बांगलादेश सरकार अत्याचार करत आहेत. याच्या निषेधार्थ पुण्यातील बालगंधर्व चौक येथे ठाकरे गटाने धरणे आंदोलन केले. यावेळी शिवसैनिकांनी बांगलादेश विरोधात आणि केंद्र सरकार विरोधात घोषणाबाजी करत बांगलादेशचा झेंडा पायाखाली तुडवत जाळण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी वेळीच त्यांना रोखून झेंडा आपल्या ताब्यात घेतला. याबाबत शहराध्यक्ष संजय मोरे म्हणाले की, बांगलादेशची लाडकी बहीण शेख हसीना




यांना भारताने स्वीकारले. मात्र, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बांगलादेशमधील हिंदू समाजावर होणाऱ्या अत्याचाराला रोखू शकले नाहीत. रशिया आणि युक्रेनमधील वादात मध्यस्थी करणाऱ्या नरेंद्र मोदी यांना शेजारील बांगलादेशमध्ये हिंदूंवर अत्याचार होताना हस्तक्षेप करता येत नाही. भारतातील हिंदू हे हिंदू समजले जात असतील तर देशाच्या बाहेर राहणारे हिंदूदेखील हिंदू आहेत.

## कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशात ६ महिने 'एस्मा'

■ लखनऊ

**आगामी** कुंभमेळा व इतर कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील सर्व सरकारी कर्मचाऱ्यांनी पुढील सहा महिन्यात कोणताही संप करता येणार नाही. राज्यात या काळात अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा अर्थात एस्मा लागू करून संपावर बंदी घातली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी हे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार राज्य सरकारचे सर्व विभाग, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचाऱ्यांसाठी हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. राज्य सरकारचे प्रवक्ते मनिष शुक्ला यांनी म्हटले आहे की, राज्यात येत्या महिन्यात भव्य कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्यात इतरही अनेक कार्यक्रम असल्याने ही बंदी घालण्यात आली आहे. स्थानिक नागरिक व येणाऱ्या भाविकांच्या अत्यावश्यक सेवांमध्ये खंड पडू नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान उत्तर प्रदेशातील विरोधी पक्षांनी या आदेशाला लोकशाहीविरोधी म्हटले आहे.

